

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

जुलै २०२४

ई - मासिक







विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर





# विद्यावार्ता

ई - मासिक



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

सहसंपादक

**श्री. ओम जगताप**

जनसंपर्क विभाग

https://www.sgbau.ac.in

# अनुक्रमणिका

- विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप १
- विद्यापीठात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची सभा संपन्न ३
- विद्यापीठात भारतीय चार्टर्ड अकाऊंट्स म्युझीअमचे उद्घाटन संपन्न ५
- विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न ६
- विद्यापीठात 'इतरांचा आदर, महिलांचा सन्मान' या विषयावर कार्यशाळा संपन्न ८
- सीए. पुष्कर देशपांडे यांनी स्विकारला विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी पदाचा पदभार ९
- विज्ञानकथा दिनानिमित्त विद्यापीठात विविध विज्ञान कथांचे अभिवाचन १०
- विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात गुरूपोर्णिमा उत्साहात साजरी ११
- लेख विशेष १२
- जयंती विशेष २१
- बातमी कात्रणे २२



# विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचा-यांना सन्मानपूर्वक निरोप

## विद्यापीठाला कर्मचा-यांची प्रदीर्घ सेवा ही तपश्याच - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते..

विद्यापीठाला कर्मचारी प्रदीर्घ अशी सेवा देत आहेत, सेवानिवृत्त होत असले तरी, त्यांची ही एकप्रकारे तपश्याच आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्य. प. सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. एच.पी. नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री विनोद काळे, सौ. काळे, सौ. आशा भोपाळे, श्री भोपाळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांची उपस्थिती होती.

कुलगुरू पुढे म्हणाले, ज्या संस्थेमध्ये आपण सेवा देत असतो, ते सुध्दा आपले एक कुटुंबच असते आणि आपल्या कुटुंबाप्रती आपण ध्येय ठेवले, तर त्या संस्थेला आपण आणखी उंचीवर नेऊ शकतो, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या. यावेळी सौ. आशा भोपाळे यांना स्मृतिचिन्ह व गौरवपत्र तसेच श्री भोपाळे व श्री विनोद काळे यांचा शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्हे, गौरवप्रमाणपत्र देऊन कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी सत्कार केला. तर सौ. भोपाळे यांचा सौ. ज्योती गेडाम व सौ. काळे यांचा सौ. रजनी चपाटे यांनी साडीचोळी, कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी आपल्या मनोगतातून विद्यापीठाला सेवा देत असलेल्या कर्मचा–यांचे कौतुक करुन पुढील आयुष्याच्या शुभकामना दिल्यात. तर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यापीठात शिकत असतांनाच्या आठवणींना उजाळा देऊन सत्कारमूर्तींच्या उज्वल भविष्याची कामना केली.

याप्रसंगी सत्कारमूर्ती श्री विनोद काळे व सौ. आशा भोपाळे यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा–यांच्या मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. नियंत्रण अधिकारी डॉ.वैशाली गुडधे, डॉ. एच.पी. नांदुरकर, श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सेवानिवृत्त कर्मचा–यांना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे व सचिव श्रीकांत तायडे तसेच पदाधिका–यांनी सत्कारमूर्तींचा स्मृतिचिन्ह, पुस्तक व भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला.राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार कुलगुरुंचे स्वीय सहायक श्री रमेश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे



व्य.प.सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर



कुलसचिव डॉ. अविनाश असनारे



मनोगत व्यक्त करतांना
विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख



मनोगत व्यक्त करतांना
सत्कारमूर्ती श्री विनोद काळे



मनोगत व्यक्त करतांना
सत्कारमूर्ती सौ. आशा भोपाळे



सत्कारमूर्ती श्री विनोद काळे यांचा सत्कार करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सत्कारमूर्ती सौ. आशा भोपाळे यांचा सत्कार करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

# विद्यापीठात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिका-यांची सभा संपन्न

## महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवाव्यात-कुलगुरु डॉ.मिलींद बारहाते




सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी हितार्थ असलेल्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचाव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्राचार्य, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या शुक्रवारी झालेल्या संयुक्त सभेत केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने विद्यापीठ परिसरातीलच दृकश्राव्य सभागृहात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांची संयुक्त सभा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर विद्यार्थी विकास मंडळाचे अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. सावन देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निखिल नलोडे, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. नेत्रा मानकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते पुढे म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी बारा योजना आहेत. योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना झाला पाहिजे, त्यासाठीची प्रक्रिया विद्यापीठाने ऑनलाईन पध्दतीने पोर्टलव्दारे महाविद्यालयांना उपलब्ध करुन दिलेली असून महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे योजनेचे अर्ज पोर्टलव्दारे विद्यापीठाकडे सादर करावेत. ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना योजनांची माहिती करुन देऊन त्यांना त्यांचा लाभ मिळवून द्यावा, जेणेकरुन असे विद्यार्थी विकासाच्या प्रवाहात येतील, एवढेच नाही, तर योजनांचे उद्दिष्ट सुध्दा यशस्वी होईल. अनेक पुरस्कारही विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येतात, त्याचीही माहिती विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी करुन द्यावी, जेणेकरुन विद्यार्थी त्यादृष्टीने परिश्रम करतील, असेही कुलगुरू म्हणाले.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व विद्यार्थी

विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत, शुध्द पेयजल, शिक्षण संरक्षण, विद्याधन, विद्यार्थी विकास निधी, शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, सायकल, विद्यार्थी सुरक्षा, स्व. रामप्रकाश शामलाल राठी स्मृति शिष्यवृत्ती, विद्यापीठ दायित्व निधी/महाविद्यालय दायित्व निधी आणि विविध पुरस्कार योजनेमध्ये असलेले आदर्श विद्यार्थी पुरस्कार, बेस्ट एन.सी.सी. कॅडेट, उत्कृष्ट कलावंत उत्कृष्ट विद्यार्थी, विद्यार्थीनी पुरस्कार अशा विविध योजनांची माहिती दिली. तव्दतच विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थी विकास कक्ष, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण,समान संधी कक्ष, संगीत कला आणि सांस्कृतिक कक्ष, प्लेसमेंट असे कक्ष महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांमध्ये सुरू करणे आवश्यक असल्याचे सांगून या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे स्पष्ट केले. तर आशीष देशपांडे यांनी विद्यार्थी विकास विभागाकडून सुरूकरण्यात आलेल्या पोर्टल आणि त्याव्दारे ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयांनी काय प्रक्रिया करावी, याची माहिती दिली. यावेळी प्राचार्य तसेच विकास अधिका–यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले व सूचनांवर अंमलबजावणी देखील करण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्पष्ट केले.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने सभेची सुरुवात करण्यात आली. सभेच्या आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी स्पष्ट केली. सूत्रसंचालन व आभार डॉ. अभिजित इंगळे यांनी मानले. सभेला विद्यापीठातील विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विद्यापीठ अंतर्गत येणा–या पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे विद्यार्थी विकास अधिकारी, शिक्षक माठ्या संख्येने उपस्थित होते.





# भारतीय चार्टर्ड अकाऊंटंट्सचे अमरावती विद्यापीठात म्युझियम.. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन..

## विद्यार्थ्यांना सी.ए. म्युझियमचा मोठा लाभ होणार-कुलगुरू

भारतीय चार्टर्ड अकाऊंटंटस अमरावती शाखेचे अकाऊन्टन्सी म्युझियम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील एम.बी.ए. विभागात सुरू झाले असून त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी फित कापून केले. अमरावती सी.ए. फाऊंडेशनच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या या म्युझियमचा वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांना मोठा लाभ होईल, असे याप्रसंगी बोलतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले.

सी.ए.फाऊंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चार्टर्ड अकाऊंटबाबत मार्गदर्शन मिळेल तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना इटर्नशीप मिळू शकेल असा विश्वास याप्रसंगी अमरावती सी.ए. शाखेच्या पदाधिका-यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याशी वार्तालाप करतांना व्यक्त केला.

या म्युझियममुळे विद्यार्थ्यांना पूर्वीच्या आणि सध्याच्या लेखापरिक्षणाविषयाची जाण व्हावी, त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनाही त्याचे ज्ञान मिळावे, या दृष्टीने अनेक मान्यवर सी.ए. यांचे माहिती देणारे लेख देखील पोस्टर्सरुपाने लावण्यात आल्याची माहिती एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. डी.वाय. चाचरकर यांनी दिली. यावेळी वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष सी.ए. अंकित राठी, उपाध्यक्ष सी.ए. राहुल पारेख, सचिव सी.ए. गौतम लाठ, कोषाध्यक्ष सी.ए. पिंकी केडिया, सी.ए. सौरभ अजमेरा, अमरावती सी.ए. फाऊंडेशनच्या अध्यक्ष सी.ए. अनुपमा लढ्ढा, सचिव दिव्या त्रिकोटी तसेच एम.बी.ए. विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

## नवीन शैक्षणिक धोरणानुसार नवीन अभ्यासक्रम लागू करण्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी

**प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन**





प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी स्तरावर नवीन अभ्यासक्रम २०२४-२५ पासून लागू करावयाचे असून त्याकरीता शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता कार्यशाळा महत्वाची ठरणार असून शिक्षकांनी नवीन अभ्यासक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. या धोरणाची माहिती विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमाकरीता २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाव्दारे नवीन अभ्यासक्रम लागू केल्या जाणार आहे. हा अभ्यासक्रम लागू करण्याकरीता त्याची संपूर्ण माहिती शिक्षकांना मिळावी, यासाठी प्रशिक्षण देण्याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासह पाचही जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमध्ये एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहामध्ये अमरावती जिल्ह्याकरीता १६ जुलै, २०२४ रोजी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करतांना बोलत होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठातील मानवविद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, ब्रीजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक धोटे, मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मो. अतिक यांची उपस्थिती होती.

डॉ. ढोरे पुढे म्हणाले, ३४ वर्षानंतर १९८६ नंतर नवीन शैक्षणिक धोरण आपल्याला मिळाले आहे. २०२३-२४ पासून शैक्षणिक धोरणाची पदव्युत्तर व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये अंमलबजावणी करण्यात आली. यावर्षीपासून पदवी स्तरावर नवीन शैक्षणिक धोरण लागू होत आहे. अभ्यास मंडळांनी नवीन अभ्यासक्रम तयार करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली ही प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.

शिक्षकांचे यामधून सर्व शंकांचे निरसन होणार आहे. चारही विद्याशाखेंतर्गत ही प्रशिक्षण कार्यशाळा पाचही जिल्ह्यातील शिक्षकांसाठी होत असल्यामुळे नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी सुलभ होणार आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेचा सर्वांनी लाभ घेऊन पदवी स्तरावर नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम लागू करण्यासाठी परिश्रम घ्यावेत. या माध्यमातून विद्यार्थी, पालकांपर्यंत याची माहिती सर्व शिक्षकांनी पोहचवावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.



या कार्यशाळेत विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल व ब्रीजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक धोटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या रेडीनेस फॉर इम्प्लिमेंटेशन यावर सखोल मार्गदर्शन केले. तर विद्यापीठातील मानवविद्या शाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे व डॉ. अण्णा वैद्य यांनी मार्गदर्शन करतांना पदवी पातळीवर नवीन शैक्षणिक धोरण राबविणे बंधनकारक असल्याचे सांगून नवीन शैक्षणिक धोरण शिक्षक, विद्यार्थी, पालकांपर्यंत पोहचविण्यास या कार्यशाळेचा उपयोग होणार असल्याचे सांगितले. राष्ट्रविकासात शिक्षकांची महत्वाची भूमिका असल्याचेही त्या म्हणाल्या. वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. डी.डब्ल्यू. निचित व डॉ. अरूणा वाडेकर यांनी व नंतरच्या सत्रात आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, डॉ. तनुजा राऊत व डॉ. वैशाली धनविजाय यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठ गीताने उद्घाटन सत्र सुरू झाले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल यांनी, तर आभार विद्यापीठाच्या मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मो. अतिक यांनी मानले. कार्यशाळेला ननसा चे संचालक डॉ. अजय लाड, तसेच अमरावती शहरासह जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मान्यवरांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन


डॉ. दिपक धोटे


डॉ. संजय डुडुल


डॉ. मोना चिमोटे


डॉ. वैशाली गुडधे


डॉ. डी. डब्ल्यु. निचित


डॉ. तनुजा राऊत


डॉ. अरूणा वाडेकर


डॉ. वैशाली धनविजय


डॉ. अण्णा वैद्य

# ‘इतरांचा आदर-महिलांचा सन्मान’ याविषयावर सहविचार सभा संपन्न

## विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर आणि मास्वे संस्था यांचा संयुक्त उपक्रम



समाजातील विविध क्षेत्रांमध्ये महिलांना मिळणारी वागणूक ही अनेकदा अपमानजनक स्वरुपाची असते. अनेक ठिकाणी महिलांचा अपमान करणाऱ्या शिव्यांचा वापर केला जातो. त्यामुळे ही समस्या दूर करण्यासाठी प्रचार, प्रसार करणे व एक चळवळ उभी करून समाजात जाणीवजागृती निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून शैक्षणिक पातळीवर उच्च शिक्षणाच्या स्तरावर या समस्येवर उपाययोजना करता येईल, असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे यांनी व्यक्त केले. विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे), महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ’इतरांचा आदर – महिलांचा सन्मान ’ याविषयावर आयोजित सहविचार सभेत अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. मार्गदर्शक म्हणून मास्वेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य डॉ. अंबादास मोहिते उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि पुढाकारातून शिव्यामुक्त अभियान सुरू करण्यासाठी ही सहविचार सभा आयोजित करण्यात आली.

मार्गदर्शनकरताना त्यांनी सांगितले की, आई-बहिणीच्या नावाने किंवा एकूणच स्त्रियांच्या नावाने अश्लील शिव्यांचा वापर करून अपमान करणे फार गंभीर बाब आहे. भविष्यात समाजाच्या सांस्कृतिक मुल्यांची किंमत यामुळे कमी होऊ शकते. सुसंस्कृत आणि अभिरुची संपन्न समाज बनविण्यासाठी, संविधानाच्या तरतुदींच्या सन्मानासाठी व लिंगाधारित समानतेसाठी अशा शिव्यांना हद्दपार करण्यासाठी शासनाकडे विशेष कायदा व इतर उपाय योजना करण्यासाठी पाठपुरावा करणे आणि समाजात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

सहविचार सभेला अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे, अधिसभा सदस्य तथा भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील प्राचार्य डॉ. अनुराधा वैद्य, विद्यापीठातील मानव विज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता तथा पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रजिया सुलताना, डॉ. दया पांडे, अभ्यासक डॉ. अलका गायकवाड, पंडित पंडागळे, सर्जन डॉ. श्यामसुंदर निकम, विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ. प्रणव कोलते, तक्षशिला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली वाठ, पत्रकार रवींद्र लाखोडे, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथील ॲड. शीतल मेटकर, समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा येथील डॉ. शिवाजी तुपेकर, श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथील डॉ. संजय खडसे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील ग्रंथपाल डॉ. महेंद्र मेटे, विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. किशोर राऊत, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील डॉ. जाकीर खान सलाम खान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक आशिष भाकरे, सांध्य दैनिक युवा दौरचे राजलक्ष्मी केशरवाणी, रुची ककरणीया, जिजाऊ ब्रिगेडच्या अमरावती प्रतिनिधी डॉ. मनाली तायडे, छाया देशमुख, जिल्हा महिला व बाल विकास विभागातील ॲड. संध्या वानखडे आदी विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते सहविचार सभेला उपस्थित होते.



या सभेत स्त्रियांविरुद्ध वापरल्या जाणाऱ्या शिव्यांबाबत प्रतिबंधात्मक दृष्टीकोनातून विविध पातळ्यांवर चर्चा झाली. या सर्वांनी उपस्थित सर्वांनी शिव्यामुक्त समाज तयार करण्याच्या बाबत आपापली मते व्यक्त केली. सभेत 'शिव्यामुक्त समाज अभियान समिती' गठीत करण्यात आली. सभेच्या शेवटी शिव्या प्रतिबंधासाठी सक्रिय कार्य करण्याबाबत उपस्थितांनी प्रतिज्ञा घेतली. तसेच या दृष्टीने पुढील काळात करावयाच्या कार्याबाबत कृति कार्यक्रम ठरवण्यात आला.



## सीए. पुष्कर देशपांडे यांनी स्वीकारला विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी पदाचा पदभार



वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी पदी सीए. पुष्कर देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. गुरुवार दि. १ ऑगस्ट, २०२४ रोजी सीए. पुष्कर देशपांडे यांनी आपल्या पदाचा पदभार प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे यांच्याकडून स्वीकारला.

सीए. पुष्कर देशपांडे हे मूळचे अकोला येथील रहिवाशी असून यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र स्टेट्स सिड्स कार्पोरेशन, अकोला (महाबीज) येथे २०१७ पर्यंत उपमहाव्यवस्थापक (अंकेक्षण) व वित्त या पदावर कार्य केलेले आहे. २०१७ ते २०२४ पर्यंत त्यांनी इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, नागपूर (आय.आय.एम.) येथे व्यवस्थापक वित्त या पदावर कार्य केले असून त्यांना वित्त व लेखा विषयाच्या कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. विशेष म्हणजे ते चार्टर्ड अकाऊन्टन्ट आहेत. सीए. पुष्कर देशपांडे यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ विद्यापीठाच्या वित्त विषयक बाबींसाठी होईल. वित्त विभागातील सर्व व्यवहाराचे संगणकीकरण करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला आहे. कमी मनुष्यबळामध्ये वित्त विभाग सक्षम करण्यावर त्यांचा भर राहणार असून वित्तीय कामकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना ऑनलाईन वित्तीय सुविधा देण्यावर त्यांचा भर राहणार आहे. त्यांचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय विज्ञानकथा दिनानिमित्ताने विविध विज्ञान कथांचे अभिवाचन

## विज्ञान प्रसारासाठी साहित्याचे योगदान महत्वाचे : डॉ. माधव पुटवाड

अवतीभोवती असलेली सर्वसामान्य माणसे, त्यांचा सभोवताल, दैनंदिन जीवनानुभव कथांच्या माध्यमातून मांडण्याची दीर्घ परंपरा आहे.अनुभवांची कौशल्यपूर्ण गुंफण करण्यातून जसा कथार्थ सूचित होतो, तशी लेखकांची जीवनदृष्टीही त्यातून प्रकटते, असे प्रतिपादन समीक्षक प्रा.डॉ. माधव पुटवाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञानकथा दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान कथांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. प्रणव कोलते उपस्थित होते.

नामवंत खगोल शास्त्रज्ञ, साहित्यिक डॉ.जयंत नारळीकर यांचे मराठी विज्ञान कथाक्षेत्रातील योगदान लक्षात घेता, यांचा जन्मदिवस १९ जुलै हा राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ आणि मराठी विज्ञानकथेला आधुनिक चेहरा देणारे साक्षेपी लेखक म्हणून डॉ. नारळीकरांचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील साहित्य व विज्ञान संस्थांनी या दिवशी विज्ञानकथा स्पर्धा, विज्ञानकथा वाचन, विज्ञानकथा कथन, चर्चा, परिसंवाद, भाषणे असे कार्यक्रम ठेवावेत, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेने केले होते. त्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सन २०२२पासून १९ जुलै हा दिवस राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा केला जात असून महाराष्ट्रात यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याउपक्रमाचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. प्रणव कोलते यांनी आपल्या मनोगतातून देशातील सर्वसामान्य माणसात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञान प्रसाराची आवश्यकता असून त्यासाठी साहित्य हे सशक्त माध्यम आहे.विज्ञान साहित्याची निर्मिती जेवढी विपूल होईल तेवढे मराठी साहित्य अधिक समृद्ध होईल असे प्रतिपादन केले.

यावेळी जयंत नारळीकर व जयंत देशपांडे यांच्या विज्ञान कथांचे अभिवाचन करण्यात आले. अभिवाचक म्हणून सारिका वनवे, अमृता राऊत यांनी सहभाग नोंदविला. यावेळी विभागातील अंशदायी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अभिजित इंगळे यांनी तर आभारप्रदर्शन वैष्णवी मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनिष तायडे, राजकुमार चांदेकर, साधना पोकळे, प्राजक्ता गवई यांनी विशेष परिश्रम घेतले.



**मार्गदर्शन करतांना डॉ. माधव पुटवाड**




# विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्यावतीने गुरू पौर्णिमेनिमित्त सोमवार दि. २२ जुलै,२०२४ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. बी. नायक, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. के. यु. राऊत उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. राऊत म्हणाले, सध्याच्या काळात गुरु – शिष्यांमधील नात्यांचा ओलावा सोशल मीडियामुळे कमी होत असून तो टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. सोशल मीडियाला दूर सारून शिक्षकांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढविण्यासाठी प्रयत्न गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. के. बी. नायक मार्गदर्शन करतांना म्हणाले, निसर्ग हा आपला प्रथम गुरु आहे. गुरुर्ब्राम्हा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरा, गुरु साक्षात परब्राम्ह तस्मै श्री गुरवे नमाः या श्लोकाप्रमाणेच बुद्धम शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि या विचारांमधून बुद्धांनी सुध्दा आपल्याला गुरूंचे महत्व सांगितले असल्याचे ते म्हणाले. सर्व धर्मांमध्ये गुरूंचे महत्व प्रकर्षाने विषद केलेले आहे. निसर्गानंतर आई–वडील, प्राणिमात्र, वस्तू याकडून सुध्दा आपण सतत काही ना काही शिकत असतो. जीवनामध्ये ध्येय साध्य करावयाचे असेल, तर गुरू शिवाय पर्याय नाही, असे मोलाचे मार्गदर्शन डॉ. नायक यांनी केले.

याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुं प्रती मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्यात. डॉ. के. बी. नायक आणि डॉ. के. यू. राऊत यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोहिणी देशमुख यांनी तर आभार सुनिता इंगळे यांनी मानले. कायक्रमाला समाजशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील डॉ. रोहिणी देशमुख, डॉ. रोहिणी वावरे, सुनिता इंगळे, साधना इंगोले, संशोधक विद्यार्थी रमेश पवार, राजकुमार सरयाम, कर्मचारी उपेंद्र मिश्रा यांनी परिश्रम घेतले.





# एनईपी -२०२० वर आधारीत M.SC. (अप्लॉईड इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रम : अनेक संधी

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत उपयोजित परमाणु विद्युत विभागाद्वारे NEP-२०२० वर आधारीत एम.एस्सी.(अप्लॉईड इलेक्ट्रॉनिक्स) हा व्दिवषीय पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु केला आहे. अभियांत्रिकी विद्याशाखेत अंतर्भूत असलेला या अभ्यासक्रमाला स्नातक पदवीला इलेक्ट्रॉनिक्स/ फिजिक्स/ इन्स्ट्रुमेंटेशन /कम्प्युटर सायन्स सोबत १०+२ लेव्हल ला गणित किंवा बॅचलर ऑफ कम्प्युटर अप्लीकेशन किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची समकक्ष पदवी मिळालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. २०२३-२४ या शैक्षणिक सत्रापासून NEP प्रमाणे Syllabus तयार करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक सत्रात कोअर तसेच प्रोफेशनल इलेक्टिव विषयांचा समाविष्ट करण्यात आले आहेत. संपूर्ण अभ्यासक्रमामध्ये १२ कोअर विषय, रिसर्च मेथोडॉलॉजी आणि IPR तसेच ०४ नाविन्यपूर्ण व आधुनिक प्रोफेशनल इल्केटीव विषयांच्या स्वतंत्र बास्केट देण्यात आल्या आहेत. प्रत्येक बास्केट मध्ये ०३ विषय असून त्यापैकी कोणताही एक विषय आपल्या आवडी प्रमाणे विद्यार्थी निवडू शकतात. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी १ वर्षानंतर PG Diploma प्राप्त करुन ऐच्छिक Exit ची संधी मिळू शकेल. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मिलींद बारहाते यांच्या प्रेरत नेतृत्व आणि बहुमूल्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांसाठी अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

प्रोफेशनल इलेक्टिव्ह विषयावर आधारित प्रात्यक्षिके सुद्धा समाविष्ट करण्यात आली आहेत यामुळे विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रमुख विषय यासोबतच इतर महत्वाच्या विषयांवर प्रात्यक्षिके करता येतील. बदलत्या काळाची गरज लक्षात घेता या अभ्यासक्रमांमध्ये अनेक नवनवीन विषयांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच या अभ्यासक्रमामध्ये इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) हा रिसर्च स्किल एनहांसमेंट कोर्स सुद्धा समाविष्ट करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या प्रमुख विषया सोबतच रिसर्च प्रोजेक्ट, रिमोट सेन्सिंग, स्मार्ट सेन्सर्स, टेक्स्ट माईनिंग,पॅटर्न रेकग्निशन, ईमेज अँन्ड व्हिडीओ प्रोसेसिंग, ईमेज अँन्ड स्पिच प्रोसेसिंग, मशिन लर्निंग, जनरेटीव्ह डीप लर्निंग, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना उन्हाळी आणि हिवाळी दीर्घ सुटी मध्ये किमान ६० तासांची इंटर्नशिप/ करणे अनिवार्य आहे व यासाठी विभागाद्वारे आवश्यक मदत करण्यात येते.

या विभागात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन संबंधित विषय व प्रात्यक्षिके अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांद्वारे शिकविले जातात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याकरिता संवाद कौशल्य, गटचर्चा, नेतृत्वगुण आधी क्षमतांचा विकास होण्यासाठी विशेष लक्ष दिल्या जाते. तसेच विद्यार्थ्यांना गेट, सेट, नेट व इतर स्पर्धा परीक्षांकरिता मार्गदर्शन केल्या जाते. या विभागाकडे आधुनिक विषय शिकवण्यासाठी वातानुकूलित प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांना संशोधन व विकास करण्यासाठी तसेच विविध प्रोजेक्ट करण्यासाठी अद्यावत कार्यशाळा उपलब्ध आहे.

**M.Sc.** (Applied Electronics) हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी इ.ए.(Electronics & Telecommunication) या अभ्यासक्रमामधील ८० टक्के समान विषय शिकतात. हा अभ्यासक्रम अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विद्याशाखेमध्ये सुरु करण्यात आला होता. तसेच विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी बद्दल प्रशिक्षित करणे हा त्याचा उद्देश आहे. पूर्वी Oracle, Tektronix, Infosys, TCS, Cognizant, Persistent, Scientech, IBM, Marvell, BSNL, Tech Mahindra, Syntel, L&T Infotech, Videocon, CDAC, Samsung, यासह अनेक विद्यार्थ्यांना MNCs मध्ये नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच काही विद्यार्थी रोबोनिक्स प्रायव्हेट लिमिटेड, जिंदाल सॉ लि., इलेक्ट्रॉनिक्स आर्ट प्रायव्हेट लिमिटेड, इ. कंपन्या मध्ये नियुक्त झाले आहे.

अनेक विद्याथी इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीचे पदव्युत्तर तसेच पीएच.डी. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये उच्च शिक्षण घेऊन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यासारख्या विविध प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत आणि त्यापैकी काही विभाग आणि संस्थांमध्ये अनुक्रमे विभाग प्रमुख आणि प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. इतर काही विद्यार्थ्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, इक्विटास बँक, कॅनरा बँक इत्यादी बँकिंग क्षेत्रात नियुक्त करण्यात आले आहे. शिवाय, काही विद्यार्थी भारतीय नौदल, मर्चंट नेव्ही, संरक्षण मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण, बीएसएनएल, इत्यादी ठिकाणी नोकरी करीत असून काही विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे त्यांचे छोटे उद्योग स्थापन केले आहेत आणि आता ते स्वयंरोजगार करत आहेत. तसेच ते इतर विद्यार्थ्यांनाही रोजगार देत आहेत.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स व कम्प्युटर उद्योग क्षेत्रात अभियंते, व्यवस्थापक किंवा सिस्टीम डेव्हलपर्स म्हणून मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थी विविध उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील संस्थांमध्ये काम करू शकतात, ज्यात प्रसारण, मागदर्शन, डेटा कम्युनिकेशन, मनोरंजन, संशोधन आणि विकास आणि सिस्टिम सपोर्ट यांचा समावेश आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन विषयातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत जसे सेवा अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स डिझाइन अभियंता, फील्ड चाचणी अभियंता, कम्युनिकेशन्स अभियंता, ग्राहक समर्थन अभियंता, फील्ड चाचणी अभियंता, नेटवर्क नियोजन अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन सल्लागार, इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञ, संशोधन आणि विकास सॉफ्टवेअर अभियंता, वरिष्ठ विक्री व्यवस्थापक, तांत्रिक संचालक, अपरश्रेस ॲप्लिकेशन इंजिनीअर, टेलिकॉम इंजिनिअर, व्हीएलएसआय आणि एम्बेडेड सिस्टम (ऑटोमेशन) इंडस्ट्रीज, डेटा प्रोसेसिंग इंडस्ट्रीज इत्यादी.

M.Sc. (Applied Electronics) या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता B.Sc.with (Physics/Chemistry/Mathematics/Computer Science/Electronics Instrumentation) or BCA with Mathematics at 10+2 level Or Bachelor of Computer Science or Equivalent degree of any other statutory University. Minimum 45% marks at B.Sc. for General (Open) Category, Minimum 40% marks at B.Sc. for Reserved Category. M.Sc. अप्लाइड इलेक्ट्रॉनिक्स विद्यार्थी स्वयं-रोजगार/स्टार्ट-अप/व्यवसाय इत्यादी करू शकतात. विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन आपले भविष्य उज्वल करण्याची संधी प्राप्त करावी.

# निसर्गोपचार स्व-स्वास्थ्याचा मूलमंत्र

आधुनिक जीवनशैलीत स्व–स्वास्थ्याला जाणून घेणे आज काळाची गरज आहे. निसर्गोपचार प्राचीन चिकित्सा पध्दतीचा अगदी पुरातन काळापासून आपण अवलंब करीत आहे पूर्वीच्या काळी निसर्गोपचार पद्धत ही जीवन जगण्याची पद्धत होती. त्यावेळी इतके भयानक आजारही नव्हते. जसजसे आपण आधुनिक जीवनशैलीकडे वळत आहोत तसतसे आपण अनेक आजारांना सामोरे जात आहोत. रोज नव्याने विविध आजारांची नावे आपणास ऐकायला मिळतात. कित्येकदा तर आजाराचे निदान न होताच रोगी आपला जीव गमावतो. अगदी लहान मुलांपासून तर वृद्धांपर्यंत यातून कोणीही वाचू शकत नाही. आधुनिक जीवनशैली आपल्याला आधुनिकतेकडे व त्याचबरोबर अनेक आजारांकडे वाटचाल करायला लावते. निसर्गोपचार पद्धत ही जीवन जगण्याची कला आहे जी पूर्वीपासून अवलंबली जायची परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेला आहे. व्यक्ती रोगी बनत चाललेला आहे. या निसर्गोपचार चिकित्सा पद्धतीचे सखोल ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे फार गरजेचे आहे. निसर्गोपचार व योगशास्त्र पध्दतीचा मानवी जीवनाच्या दृष्टीकोनातून होणारा सकारात्मक परिणाम सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्रात प्रथमच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाअंतर्गत पी.जी. डिप्लोमा इन नॅचरोपॅथी ॲन्ड यौगिक सायन्स हा १ वर्षाचा अभ्यासक्रम २०२१ पासून यशस्वीरीत्या सुरु आहे. निसर्गोपचार पद्धतीची सखोल माहिती मिळण्याकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन विस्तार विभागात पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार व योगशास्त्र हा एक वर्षाचा अभ्यासक्रम चालवला जातो ज्यामध्ये विविध निसर्गोपचार पद्धती विविध आजारांवर कशा उपयुक्त आहेत त्याचबरोबर औषधांचा उपयोग न करता आपण कशा पद्धतीने रोगमुक्त होऊ शकतो व औषधांच्या होणारा दुष्परिणामपासूनही आपण वाचू शकतो व स्वस्थ शरीर कसे ठेवावे याकडे लक्ष केंद्रित करणे व स्वस्थ समाजाची निर्मिती करणे हा एकमेव अभ्यासक्रमाचा उद्देश आहे या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्याला निसर्ग उपचाराबरोबरच इतर पर्यायी चिकित्सा पद्धतीचे ज्ञान दिले जाते जेणेकरून विना औषधी विना इंजेक्शन आणि विना ऑपरेशन व्यक्ती रोगमुक्त होईल या अभ्यासक्रमा मध्ये विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे सखोल ज्ञान देण्यात येते त्याचबरोबर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, विविध क्षेत्र भेट, कार्यशाळा, याद्वारा विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडल्या जाते. या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थी स्वतःचे निसर्गोपचार केंद्र, योग वर्ग सुरू करू शकतो. त्याचबरोबर कोणत्याही निसर्गोपचार केंद्राला, फिजिओथेरपी केंद्राला, हेल्थ सेंटरला सहाय्यक तज्ज्ञ म्हणून कार्य करू शकतो. तसेच स्वतःच्या परिवाराची व समाजाच्या स्वास्थ्याप्रती जागरूक होतो .हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थी अर्थाजन करण्यास सक्षम होतो. आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्वस्थ समाज निर्मितीसाठी स्व–स्वास्थ्यासाठी हा अभ्यासक्रम अतिशय महत्वाचा आहे अशी माहिती देत विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यास आवाहन केले आहे कुठल्याही शाखेतील पदवीधर या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. प्रवेशाकरिता संपर्क क्र. डॉ. अश्विनी राऊत ८०८७७४१४६१, प्रा. राहुल दोडके ९८२२५०८३६४

**डॉ. श्रीकांत पाटील**
संचालक
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



# कौशल्ययुक्त व नाविण्यपुर्ण अभ्यासक्रमाची आज गरज

योग्य आहार–विहार–विश्रांती, शुद्ध विचार, प्राकृतिक जीवनशैली इत्यादी सर्व बाबी आजच्या काळाची गरज बनली आहे, परंतु आज सर्व बाबींचा अभाव दिसून येतो, व्यक्तीची दिनचर्या, जीवनशैली, आहार इत्यादी वेळेवर न झाल्यामुळे या सर्वांमध्ये बिघाड निर्माण झाल्याने घराघरामध्ये कुठल्या ना कुठल्या व्याधीने ग्रस्त व्यक्ती पहावयास मिळतात, या सर्वांवर मात करण्याकरिता व्यक्तीची जीवनशैली ही प्राकृतिक असणे गरजेचे आहे व त्याच बरोबर आहार–विहार आणि विश्रांती याचे समायोजन करणे सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे, ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागात पदव्युत्तर पदविका योग थेरपी या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या अभ्यासक्रमामध्ये एकूण चार सिद्धांतिक व दोन प्रात्यक्षिक विषयाचा समावेश असून या अभ्यासक्रमाद्वारे योग चिकित्सा, वैकल्पिक चिकित्सा, निसर्गोपचार आणि शरीर क्रियाविज्ञान इत्यादी विषयांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमामध्ये चार विषयांच्या माध्यमातून प्रवेशित विद्यार्थ्याला योग संबंधित सर्व प्रकारचे अभ्यास व क्रिया यांचे सखोल ज्ञान प्राप्त होते, एवढेच नाही तर त्याला या योगाभ्यासाच्या सोबत शरीर क्रियाविज्ञान समजने गरजेचे असते त्यामुळे याचाही समावेश या अभ्यासक्रमामध्ये करण्यात आलेला आहे हा अभ्यासक्रम मुख्यत: योग या विषयावर आधारित असल्यामुळे या विषयावर अभ्यासक्रमामध्ये विशेषत: योग चिकित्सेची सर्व उपचार पद्धती शिकविल्या जातात. परंतु आज समाजामध्ये विविध उपचाराच्या पद्धती वापरल्या जातो याबद्दलही विद्यार्थ्याला ज्ञान असावे या उद्देशाने या अभ्यासक्रमामध्ये वैकल्पिक चिकित्सा पद्धती शिकविल्या जातात या अंतर्गत विविध प्रकारच्या विना औषधी उपचार पद्धती चा समावेश होतो त्याकरीता पी.जी. डिप्लोमा इन योग थेरपी या अभ्यासक्रमाशीवाय पर्याय नाही.

पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी हा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण करणे एवढाच उद्देश न ठेवता विद्यार्थ्याला विषयासंबंधी परिपूर्ण ज्ञान प्राप्त व्हावे व त्याचबरोबर त्याला संबंधित इतर विषयांचेही ज्ञान अवगत व्हावे या अनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन विभागाद्वारे विद्यार्थ्यांकरिता केल्या जाते. यामध्ये अभ्यास दौरा, व्याख्यानमाला, परिषद, संमेलन, योग शिबिरे, क्षेत्र भेट, इत्यादींचे आयोजन केल्या जाते. अशा पद्धतीने विविध उपक्रमांचे आयोजन अभ्यासक्रमाच्या सोबत केल्यामुळे विद्यार्थी संबंधित विषयांमध्ये निपूण होतो व त्याला सर्व प्रकारच्या उपचार पद्धतींचे परिपूर्ण ज्ञान अवगत होते. उपचार पद्धतींचे ज्ञान अवगत झाल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या विविध संधी त्याच्याकरिता उपलब्ध होतात कारण हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर व्यक्ती विविध प्रकारच्या शासकीय/ निमशासकीय अथवा खाजगी रुग्णालयांमध्ये सेवा देऊ शकतो तसेच स्वतःचे योग चिकित्सा केंद्र सुरूकरून उपचार देऊ शकतो एवढेच नव्हे तर विद्यालय आणि महाविद्यालय मध्ये योग शिक्षक म्हणून सुद्धा कार्य करू शकतो. इत्यादी प्रकारच्या विविध रोजगाराच्या संधी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्राप्त होतात.

डॉ. श्रीकांत पाटील संचालक व प्राध्यापक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली असा हा नाविण्यापुर्ण व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु असुन या अभ्यासक्रमास जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन समाजाभिमुख कार्यकरावे असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे. अभ्यासक्रमासंबंधी अधिक माहितीकरिता प्रा. आदित्य पुंड (समन्वयक) ७९७२३४४०६९/ ९६६५९५४६५६ / ८५५१०६४५४८ यांच्याशी संपर्क साधावा.

**डॉ. श्रीकांत पाटील**
संचालक
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# हिंदी अनुवाद पाठ्यक्रम

## रोजगाराची एक सुवर्ण संधी

आजचे युग स्पर्धात्मक युग आहे. या स्पर्धात्मक युगात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी स्वत:ला अधुनातन ज्ञानाने परिपूर्ण ठेवले पाहिजे. ज्ञान–विज्ञानाच्या माध्यमातून नित–नव्या अविष्कारांची प्राप्ती होत असते. ज्ञानार्जनाच्या अनेक प्रभावी माध्यमात मुलभूत आधार – अनुवाद आहे. या संदर्भात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावतीच्या हिंदी विभागाद्वारे अनुवाद हिंदी पाठ्यक्रम चालविल्या जात आहे. **पाठ्यक्रमाचे वैशिष्ट्य** १) केन्द्र सरकारच्या नौकरी प्राप्तीच्या अधिकतम संधी, २) अनुवाद हिंदी पाठ्यक्रमाच्या माध्यमातून आपण एक श्रेष्ठ अनुवादकाच्या पदावर कार्य करु शकता. ३) अनुवाद हिंदी पाठ्यक्रमाद्वारे हिंदी साहित्याचे अध्ययन करुन प्राध्यापकाच्या नियुक्तिसाठी सेट/नेट च्या परीक्षेला पात्र होऊ शकता आणि प्राध्यापक पदावर नियुक्ति पण मिळू शकते. ४) नौकरी सोबत अनुवादाचे स्वतंत्र कार्य करता येते. ५) स्वावलंबी बनण्याची सुसंधी प्राप्त होते. ६) अनुवाद हिंदी पाठ्यक्रमातून अनुवादाचे तकनीकी ज्ञान सहज प्राप्त होऊ शकते. ७) प्रयोजनमूलक हिंदीच्या अध्ययनाद्वारे पत्रकारिता, रेडिओ,दूरदर्शन इत्यादि क्षेत्रात काय करण्याची संधी प्राप्त होण्याची प्रबल शक्यता आहे. अंतत: वरील वैशिष्ट्यांच्या आधारावर आम्ही ठामपणे सांगू शकतो की एम.ए.(अनुवाद हिंदी) हा पाठ्यक्रम व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या बहुआयामी विकासासाठी पूर्णत: प्रभावी ठरु शकतो. यु.जी.सी. च्या निर्देशानुसार एम.ए.(अनुवाद हिंदी) पाठ्यक्रमात प्रयोजनमूलक हिंदी सोबत अनुवाद तर आहेच,सोबतच हिंदी साहित्याच्या विशेष प्रश्नपत्राला सुद्धा सेट/नेट च्या अभ्यासक्रमानुसार स्थान दिले गेले आहे.जसे हिंदी साहित्याचा इतिहास,यासोबतच अनेक रोजगारोन्मुख वैकल्पिक प्रश्नपत्राला पहिल्यांदा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठानी या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे.चतुर्थ प्रश्नपत्राच्या अंतर्गत प्रयोजनमूलक हिंदी सोबत भाषा शिक्षण विषय सुद्धा आहे.ज्यामुळे भाषा शिक्षणाच्या पद्धतीचे सैद्धांतिक,व्यावसायिक व व्यावहारिक प्रशिक्षण देवून अध्यापनाच्या सिद्धांताचे ज्ञान विद्यार्थी अर्जित करु शकतात.त्याचप्रमाणे प्रयोजनमूलक हिंदी द्वारे दूरसंचार,विदेश,बैंक,बीमा कंपनी तसेच विविध केंद्रीय सरकारच्या कार्यालयात राजभाषा अधिकारी, अनुवादकाचे प्रतिष्ठापूर्ण पद प्राप्त करता येते. सोबतच फिल्म, पत्रकारिता, रेडिओ एवं दूरदर्शनच्या क्षेत्रात विद्यार्थी प्रविष्ट होऊन रोजगार प्राप्त करु शकतात.

अशाप्रकारे एम.ए.भाग – २ मध्ये अनुवादाच्या ऐतिहासिक संदर्भासोबतच अनुवाद व्यवहार व वैकल्पिक प्रश्नपत्राच्या रूपात तीस–या प्रश्नपत्रामध्ये कोशविज्ञान,राजभाषा प्रशिक्षण व हिंदी साहित्याचा समावेश आहे. ज्यामुळे कोशनिर्माता,अनुवादक,राजभाषा अधिकारी तसेच हिंदी–शिक्षकाच्या पदावर नियुक्ति सोबतच विद्यार्थी अनुवादक सुद्धा बनु शकतात. यासोबतच अनुवाद आणि साहित्य तसेच भाषेमध्ये संशोधन कार्य केल्या जाते हे सर्वज्ञात आहे की, महाराष्ट्र राज्यात फक्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावतीतच हा अभ्यासक्रम एम.ए.(अनुवाद हिंदी)आहे व यामध्ये ३० जागा आहेत. हा अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम आहे.याबरोबरच इथे इंग्रजी आणि मराठीतून हिंदी भाषांतराचे प्रशिक्षणही दिल्या जाते. अनेक विद्वान वक्त्यांची भाषणे व राष्ट्रीय संम्मेलने तसेच शिक्षण,अनुसंधान,विस्तार व विकास तसेच इतर सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले जातात. कला शाखेच्या विद्यार्थ्यांसांठी रोजगार मिळवून देण्याची सुवर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.या विभागाचे माजी विद्यार्थी श्री अनिकेत बोरकर – हिंदुस्थान ऍरोनॉटिकल इंजीनियरिंग विभाग,नाशिक इथे राजभाषा अधिकारी या पदावर कार्यरत आहेत तसेच माजी विद्यार्थीनी कु. सरिता नंदेश्वर ही मराठी भाषी असूनही भारतीय संसद, लोकसभा,नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत.याचप्रमाणे अनेक विद्यार्थी स्वत:चे अनुवादक कार्य यशस्वीरित्या सांभाळत आहेत. येथील विद्यार्थ्यांची जिथे केंद्रीय कार्यलयातच नव्हे तर प्राध्यापक पदावर पण त्यांची निवड होत आहे. उदाहरणार्थ माजी विद्यार्थी डॉ.श्यामप्रकाश पांडे सहाय्यक प्राध्यापकच्या पदावर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी येथे कार्यरत आहे.एस.सी.,एस.टी.,ओ.बी.सी.,आणि एन.टी.शिष्यवृति व्यतिरिक्त केद्र सरकारची हिंदीतर भाषी शिष्यवृत्ति सुद्धा विद्यार्थ्यांना देण्यात येते.विभागात संशोधन कार्य सतत होत आहे. आजपर्यंत जवळ–जवळ ३० विद्यार्थी विभागातून आचार्य (पी–एच.डी) पदवी प्राप्त करून महाविद्यालय व विद्यापीठात प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले आहेत. केन्द्र सरकारच्या विविध कार्यालयात जवळ–जवळ ७० विद्यार्थ्यांनी नौकरी प्राप्त केली आहे.विभागाचे आठ विद्यार्थी नेट/सेट पास झाले आहेत.तसेच विभागात नेट/सेट परीक्षेचे निशुल्क मार्गदर्शन पण दिले जाते, या संधीचा फायदा विद्यार्थी घेवु शकतात.या संबंधीत प्रभारी विभागप्रमुख डॉ.माधव पुटवाड मो. नं.– ९४२३७५०६०२ वर संपर्क केल्या जाऊ शकतो. म्हणून विद्यार्थी–विद्यार्थिनींनी लवकरच या अभ्यासक्रमात प्रवेश घेवून इतर विद्यार्थ्यांनी पण या अभ्यासक्रमात आपले स्थान निश्चित करावे. प्रवेश संख्येच्या सीमिततेमूळे सबंधित विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर प्रवेश सुनिश्चित करावे. या विषयी माहिती प्रभारी विभागप्रमुख डॉ. माधव पुटवाड यांनी दिली आहे. विद्यार्थी–विद्यार्थिनींना रोजगाराचे सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे. या विभागात विद्यार्थ्यांना रेमीडियल,सेट/नेट मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक परीक्षाचे निशुल्क मार्गदर्शन दिल्या जाते. त्याचसोबत हिंदीच्या विद्वानांचे व्याख्यान आयोजित केले जातात.

# विद्यार्थ्यांसाठी रोजगार निर्मिती बरोबरच सुसंवाद संबंधाची जोपासना करणारा अभ्यासक्रम म्हणजे इंग्लिश कम्युनिकेशन स्किल

आज भारतासारख्या विकसनशील देशात हजारो युवक–युवतीबेरोजगार असलेले दिसून येतात. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत देशांच एकमेकांशी असलेले परस्पर संबंध हे फक्त सुसंवादातून साधता येणे शक्य होईल. आंतरराष्ट्रीय सहसंबंध निर्माण करण्यासाठी इंग्रजी ही जागतिक भाषा शिकणे हे गरजेचे आहे. सुजलाम सुफलाम म्हणून ज्या भारत देशाची ओळख आहे, त्याच भारतामध्ये आज बेरोजगारीचे प्रमाण साधारणतः ६५ टक्के असल्यामुळे दिवसेंदिवस युवकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर रोजगार मिळेलच याची शाश्वती नसतानाही हजारो तरुण उच्च शिक्षणाच्या जाळ्यात अडकले जातात आणि परिणामी त्यांना बेरोजगारीला सोमोरे जावे लागते, हीच दुर्दैवी समस्या लक्षात घेता भारत सरकारने या बेरोजगारीचे प्रमाण कुठेतरी कमी व्हावे यासाठी कौशल्य विकास अभियान राबवणे सुरू केले. या अभियानांतर्गत युवकांना वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या वाटा निर्माण करून देण्यास मदत झालेली दिसून येते. विविध क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासाला चालना मिळावी यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षण घेत असताना कौशल्यावर आधारित शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात अनिवार्य आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थी केंद्रित संकल्पना राबवून त्यामध्ये कौशल्य वाढीला प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रत्येक अभ्यासक्रमात स्किल डेव्हलपमेंट संबंधित विषय समाविष्ट करण्यात आलले आहेत. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग याचसारख्या विविध कौशल्यधिष्टीत अभ्यासक्रम चालवून आजकालच्या बेरोजगार असलेल्या तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम आपल्या विभागातून राबवत असतात. यामधून विद्यार्थ्यांना शासकीय तसेच खाजगी कार्यालयात वेगवेगळ्या क्षेत्रासाठी कार्य करणाऱ्यांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी निर्माण होण्यास मदत झाली.

आजच्या स्पर्धात्मक काळात विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यामध्ये रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून कौशल्यपूर्ण शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे झाले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला वाव मिळावा यासाठी अनेक विद्यापीठांमध्ये, कौशल्यविकासावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्याचे आदेश शासनाकडून मिळाले आहे. त्याचद्वारे आजीवन अध्ययन व विस्तार विभागांमध्ये कौशल्य विकासावर आधारित १६४ प्रकारचे अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम तर ८ प्रकारचे पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रम यशस्वीरित्या सुरूआहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करण्याची कौशल्य व नेतृत्व गुण विकसित व्हावे यासाठी हा कोर्स तयार केलेला आहे.

आजच्या शैक्षणिक धोरणानुसार भविष्यातील विद्यार्थ्यांचे शिक्षण हे जागतिक भाषा इंग्रजी मधून या विषयांमधून होत असलेली दिसून येते, विद्यार्थ्यांचे पायाभूत शिक्षण हे इंग्रजी माध्यमिक शाळेतून होत असल्यामुळे पालक आणि पाल्य यामधील संवादात तफावत आलेली दिसून येते व याच संवादाला सुधारण्यासाठी आपण इंग्रजी संवाद कौशल्य या अभ्यासक्रमातून कुठल्याही वयाची अट न ठेवता इंग्रजी भाषेची शिक्षण आपण या विभागामधून प्रौढ, मुले, युवक युवती यांना देण्याचे काम करतो. पालकांना त्यांच्या मुलांसोबत इंग्रजी बोलणे सोपे जावे यासाठी अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. म्हणून या सुवर्ण संधीचा फायदा इंग्रजी विषय शिकण्याची इच्छुक लोकांनी घ्यावा, असा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. आपल्या सुप्त गुणांना चालना देण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील 'इंग्रजी संवाद कौशल्य' या अभ्यासक्रमाविषयी जागरूक असणाऱ्या लोकांसाठी एक मोठी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तरी या संधीचा फायदा घेऊन आपली इंग्रजी विषयातील संवाद कौशल्य हा अभ्यासक्रम शिकून आपल्या ज्ञानात भर घालावी अशी विनंती विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.

१) विद्यार्थ्यांना त्यांची शाब्दिक शैली सुधारण्यासाठी तसेच अस्खलीतपे संवाद साधण्यासाठी.
२) उच्चारण सुधारण्यासाठी
३) व्यक्तिमत्व विकास वाढवण्यासाठी.

या विषयाचे ध्येय :

१) विद्यार्थी प्रभावीपणे संवाद साधू शकतील.
२) विद्यार्थी संगणका विषयी ज्ञान कौशल्य आणि निर्णय विकसित करतील ज्यामुळे इतरांसोबत सहकार्याने काम करण्याची त्यांची क्षमता सुलभ होईल. ४) संवादाच्या विविध शैली ओळखणे व समजून घेणे व इतरांशी चांगले संबंध कसे प्रस्थापित करायचे याचे योग्य ते ज्ञान शिकवले जाईल.
५) विद्यार्थी देहबोली भाषा व उच्चारणाचा योग्य चढ–उतार इंग्रजीमध्ये शिकतील.
६) विद्यार्थी इंग्रजी भाषेची रचना स्वर आणि गैर मौखिक बारकावे यामध्ये स्वतःला सक्षम बनवते.
७) विद्यार्थी वैयक्तिकरित्या आणि व्यावसायिकरित्या प्रभावी संवादाचे महत्व समजून घेण्यास सक्षम असतील.

# मराठी विभाग
# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग हा संपूर्ण महाराष्ट्रातील एक क्रियाशील शैक्षणिक विभाग आहे.मागील तीस वर्षांपासून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी व नावीन्यपूर्ण उपक्रमांनी या विभागाने शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाची वाटचाल अतिशय व्रतस्थपणे सुरू आहे. मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता, स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासक, समीक्षक, विभागप्रमुख प्रा.डॉ.मोना चिमोटे यांच्या नेतृत्वात विभाग आपली वेगळी ओळख निर्माण करीत आहे.

मराठी विभाग हा आचार्य पदवीसाठीचे अधिकृत संशोधन केंद्र म्हणून कार्यरत आहे. आचार्य पदवी कोर्स वर्क येथे यशस्वीपणे पार पाडल्या जातो. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या जेआरएफ तसेच राज्य शासनाच्या विविध संस्थांद्वारे देण्यात येत असलेल्या अधिछात्रवृत्ती अंतर्गत संशोधन करणाऱ्यांसाठी संशोधनाचे महत्वाचे केंद्र म्हणून या विभागाची ओळख आहे. उच्च शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या सर्व आधुनिक सोई सुविधा या विभागात उपलब्ध आहेत. तसेच या विभागातील शिक्षकांनी आपल्या वैयक्तिक योगदानातून विद्यार्थ्यांसाठी अद्यावत संदर्भग्रंथांनी समृद्ध असलेले दालन विभागात तयार केले आहे.विभागाची पूर्वपरंपरा कायम राखत नव्या व्यावसायिक गरजा ओळखून विविध रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात करणाऱ्या उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण –२०२० मध्ये अपेक्षित असलेल्या कौशल्याधारित बदलांसह मागील शैक्षणिक वर्षापासून नव्या अभ्यासक्रमासह एम.ए. मराठी भाग १ चे नियमित प्रवेश विभागात सुरू झाले आहेत.

विद्यार्थ्यांना जीवन व्यवहारांच्या विविध क्षेत्रांतील आंतरसंबंधाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी व वैश्विक मानवतेच्या व्यापक पटावर जीवनाचे आकलन करून देणारी दृष्टी त्यांना प्राप्त व्हावी, यासाठी विभागातील अध्यापक सातत्याने प्रयत्नशील असतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत नव्याने सुरू झालेल्या अभ्यासक्रमात जीवनोपयोगी कौशल्यांवर भर देणाऱ्या, व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक असलेल्या तसेच विविध स्पर्धापरीक्षांना उपयोगी ठरणाऱ्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. विभागाच्या वतीने सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणाऱ्या सेट,नेट परीक्षांसाह केंद्रीय लोकसेवा आयोग तसेच राज्य लोकसेवा आयोग इत्यादी परीक्षांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या 'मराठी साहित्य' या वैकल्पिक विषयाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे या हेतूने विभागाच्या वतीने विविध कार्यशाळांचे व अनौपचारिक मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात येत असते.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, विदर्भ साहित्य संघ, साहित्य अकादमी यांसारख्या शैक्षणिक संस्था यांच्या सहकार्याने विविध दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन विभागाच्या माध्यमातून करण्यात येत असते. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत विभागाच्यावतीने दरवर्षी विविध परिसंवाद, नामवंत वक्त्यांची व्याख्याने, स्पर्धा, कार्यशाळांचे आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन असे नावीन्यपूर्ण आयोजित केले जातात.

विभागात एम. ए. मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असणाऱ्या सर्व पत्रिकांचे अध्यापन येथे केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यायांपैकी आपल्या आवडीचा पर्याय निवडण्याची संधी मिळते. विभागाच्या स्थापनेपासूनच विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम स्थान मिळविण्याची परंपरा विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी कायम ठेवली आहे.विभागाचे अनेक माजी विद्यार्थी विविध महाविद्यालये आणि कार्यालयांमध्ये उच्चपदस्थ स्थानांवर कार्यरत आहेत . पत्रकारिता, आकाशवाणी, दूरदर्शन , शासकीय कार्यालये आणि शाळा – अशाही ठिकाणी या विभागाचे विद्यार्थी यशस्वीपणे वावरत आहेत.

नवीन शैक्षणिक धोरणातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती, जिज्ञासूपणा आणि ज्ञानलालसा वाढीस लागण्याच्या हेतूने व प्राप्त ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करण्याचे कौशल्य आत्मसात होण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक आणि तुलनात्मक अभ्यास दृष्टीचा विकास होण्यास मदत होणार आहे. तसेच जीवनातील सैद्धान्तिक आणि प्रायोगिक पातळीवरील समस्यांचे कालसापेक्ष भान निर्माण होऊन सर्जनशील पर्याय देण्याची प्रक्रिया त्यांच्यामध्ये विकसित होईल. माहिती व तंत्रज्ञानाची कौशल्ये विकसित करून रोजगाराच्या नवनवीन संधी त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

**रोजगाराच्या संधी:**

मराठी विषयात एम. ए. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या विविध संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होतील. त्यातील काही महत्वाच्या संधी पुढीलप्रमाणे आहेत. पदव्युत्तर मराठीचा विद्यार्थी हा शिक्षक या पदांच्या नोकरीसाठी पात्र ठरेल, सहायक प्राध्यापक होण्याची पूर्व अट तो पूर्ण करू शकेल, राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यासाठी सदर अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल, विविध सरकारी कार्यालये, एल.आय.सी., बँक, सरकारी सेवा आदी कार्यक्षेत्रांत रोजगार उपलब्ध होतील, पत्रकारिता, दूरचित्रवाणी, आकाशवाणी आदी क्षेत्रांत लेखन आणि निवेदन असे क्षेत्र निवडता येईल, भाषांतर /अनुवाद क्षेत्रात मोठी संधी मिळेल,भाषाविज्ञान, ग्रंथालयशास्त्र, सर्जनशील लेखन, नाट्यक्षेत्र इत्यादी क्षेत्रांमध्ये काम करता येईल,मुद्रित शोधन, संपादकीय व प्रकाशन व्यवसाय आदी क्षेत्रांत रोजगार मिळू शकेल, प्रवक्ता, निवेदक, भाष्यकार, सूत्रसंचालक, व्याख्याता म्हणून ओळख निर्माण करता येईल, दाखले, उदाहरणे, कोट्या, विनोद, म्हणी, वाक्यप्रचार, कविता, गझल यांचा प्रभावीपणे वापर करून उत्तम वक्ता होता येईल,भाषिक कौशल्ये व सर्जनशीलतेचा विकास होऊन लेखक म्हणून प्रस्थापित होता येईल.तसेच विद्यार्थ्याला संशोधक, विश्लेषक, तुलनाकार, टीकाकार, भाष्यकार म्हणून कार्य करता येईल, कंटेंट रायटर, संपादक, वृत्त निवेदक, सोशल मिडिया मॅनेजर इत्यादी क्षेत्रांत देखील तो रोजगार मिळवू शकेल. विद्यार्थ्याला ऑनलाईन ट्यूटर प्रशिक्षक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, युट्यूब वरून व्याकरणाच्या अध्यापनाचेव्हिडिओ प्रसारित करून रोजगार मिळवता येईल, चित्रपट व मालिका पटकथालेखन, माहितीपत्राचे लेखन, ब्लॉग रायटर, गीतकार म्हणून लौकिक व रोजगार प्राप्त करता येईल, माहितीपर लेखन, अहवाल लेखन, वृत्तांत व इतिवृत्त लेखन, माहिती पुस्तिका, माहिती पत्रक, स्मरणिका, गौरविका, मानपत्र, पत्र, पत्रिका आदींचे लेखन करता येईल, विविध समाजमाध्यमातील जाहिरात लेखनाची कौशल्ये विकसित होतील,संकेतस्थळांना हाताळण्याची व माहितीच्या विश्वासार्हतेची शहानिशा करता येईल.

अशा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या पदव्युत्तर मराठी विभागाची शैक्षणिक वर्ष २०२४–२५ एम.ए. प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्रासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP) अनुषंगाने मागील शैक्षणिक सत्रापासून नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना http://admission.sgbau.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरता येईल. प्रवेश अर्ज भरून त्याची एक प्रत पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्याकडे विहित मुदतीच्या आत सादर करावी लागणार आहे. प्रवेश प्रक्रियेविषयीचे वेळापत्रक संकेतस्थळावर दिलेले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे (९४२२१५५०८८) यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. माधव पुटवाड ( ९४२३३७५०६०२),डॉ. प्रणव कोलते ( ९८५०४८८२२२) यांच्याशी विभागात प्रत्यक्ष संपर्क साधता येईल.



# विद्यापीठातील
# भौतिकशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार पुनर्रचना
# नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठीत

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर भौतिकशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना आणि सुधारणा करण्यात आली असून अभ्यासक्रम चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम सह सेमिस्टर पॅटर्नचा व विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठीत असा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्याच्या दृष्टीने खूप लाभकारक ठरणार आहे.

विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक असलेली विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धत सी.बी.सी.एस. नुसार अभ्यासक्रम असल्याने त्याचा विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनात नवीन शैक्षणिक धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे. पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाने कंडेन्स्ड मॅटर फिजिक्स, डिजिटल आणि ॲनालॉग कम्युनिकेशन, फोटोनिक्स यासारख्या स्पेशलायझेशनची ओळख करून दिली आहे. नॅनो-सायन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजी आणि ॲडव्हान्स्ड मायक्रोप्रोसेसर आणि मायक्रो कंट्रोलर्स सारखे विविध आंतरशाखीय सामान्य स्वारस्य अभ्यासक्रम देखील विद्यार्थ्यांसाठी सादर केले आहेत. सध्या अभ्यासक्रमाच्या सेमिस्टर-१ मध्ये प्रवेश नोंदणी ३० आहे. एम.एस्सी. च्या कार्यकाळात शिकविलेला अभ्यासक्रम. संवादात्मक अध्यापन-अध्यापन, साहित्य सर्वेक्षण आधारित समीक्षा-सह-सेमिनार, प्रबंध, संशोधन समस्या इत्यादींद्वारे राष्ट्राच्या प्रगतीशील आणि सर्जनशील विकासामध्ये भौतिकशास्त्राची भूमिका समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत बाबींचा देखील समावेश आहे. विद्यार्थ्यांना दरवर्षी परीक्षांमध्ये पात्र ठरविणे, विद्यार्थ्यांना संशोधन समस्या हाताळण्यासाठी प्रवृत्त करणे आणि प्रशिक्षित केले जाते. मागील पाच वर्षातील अभ्यासक्रमाच्या प्रासंगिकतेचा निकाल उत्कृष्ट असून विद्यार्थी मध्ये पात्र ठरू शकले, तर २२ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. पीएच.डी अभ्यासक्रमाला सुध्दा विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद असून विभागाकडे एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर, फ्लूरोसेन्स स्पेक्ट्रोफोटोमीटर, थर्मो ल्युमिनेसेन्स रीडर, हाय-रिझोल्यूशन फायबर ऑप्टिक्स स्पेक्ट्रोफोटोमीटर, स्पिन कोटिंग युनिट, स्प्रे पायरोलिसिस, डिजिटल स्टोरेज ऑसिलोस्कोप इत्यादी मूलभूत आणि प्रगत वैशिष्ट्यीकरण सुविधा आहेत. विभागातील विज्ञान स्नातकोत्तर ( मास्टर ऑफ सायन्स) भौतिकशास्त्र हा अभ्यासक्रम करून विद्यार्थी, वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामान शास्त्रज्ञ, फॉरेन्सिक लॅबमध्ये विश्लेषक, आयएएस, वायरलेस स्ट्रीम मध्ये पोलीस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक, दूरसंचार अधिकारी म्हणून नियुक्त झालेले आहेत. एकुणच पदव्युत्तर शैक्षणिक भौतिकशास्त्र विभागामध्ये शैक्षणिक मूल्यांची जोपासना, शिस्त राखणे, संशोधनाची प्रेरणा, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक वृत्तीचा प्रभावी प्रसार करणे यासाठी खूप परिश्रम घेतले जात आहे.

**डॉ. संदीप वाघुळे**
**विभाग प्रमुख,**
**भौतिकशास्त्र विभाग,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**




# विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, ननसा संचालक डॉ. अजय लाड, तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# नवराष्ट्र

## नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठीत

# भौतिकशास्त्र अभ्यासक्रमाची पुनर्रचना

अमरावती, ब्युरो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर भौतिकशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना आणि सुधारणा करण्यात आली आहे. अभ्यासक्रम चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टमसह सेमिस्टर पॅटर्नचा व विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठीत असा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्याच्या दृष्टीने खूप लाभकारक ठरणार आहे.

विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक असलेली विविध कौशल्ये आत्मसात करण्यासाठी पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धत सी.बी.सी.एस. ( चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम) नुसार अभ्यासक्रम असल्याने त्याचा विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनात नवीन शैक्षणिक धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे. पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाने कंडेन्स्ड मॅटर फिजिक्स, डिजिटल आणि ॲनालॉग कम्युनिकेशन, फोटोनिक्स यासारख्या स्पेशलायझेशनची ओळख करून दिली. नॅनो-सायन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजी आणि



ॲडव्हान्स मायक्रोप्रोसेसर आणि मायक्रो कंट्रोलर्स सारख्या विविध आंतरशाखीय सामान्य स्वारस्य अभ्यासक्रम देखील विद्यार्थ्यांसाठी सादर केले आहेत. एम.एस्सी.च्या कार्यकाळात शिकविलेला अभ्यासक्रम, संवादात्मक अध्यापन-अध्यापन, साहित्य सर्वेक्षण आधारित समीक्षा-सह-सेमिनार, प्रबंध, संशोधन समस्या इत्यादींद्वारे राष्ट्राच्या प्रगतीशील आणि सर्जनशील विकासामध्ये भौतिकशास्त्राची भूमिका समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आवश्यक मुलभूत बाबींचा देखील समावेश आहे. विद्यार्थ्यांना दरवर्षी परीक्षांमध्ये पात्र ठरविणे, विद्यार्थ्यांना संशोधन समस्या हाताळण्यासाठी प्रवृत्त करणे आणि प्रशिक्षित केले जाते.

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. पीएच.डी अभ्यासक्रमालासुध्दा विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद असून, विभागाकडे एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर, फ्लूरोसेन्स स्पेक्ट्रोफोटोमीटर, थर्मो ल्युमिनेसेन्स रीडर, हाय-रिझोल्यूशन फायबर ऑप्टिक्स स्पेक्ट्रोफोटोमीटर, स्पिन कोटिंग युनिट, स्प्रे पायरोलिसिस, डिजिटल स्टोरेज ऑसिलोस्कोप आदी मुलभूत आणि प्रगत वैशिष्टीकरण सुविधा आहेत. विभागातील विज्ञान स्नातकोत्तर ( मास्टर ऑफ सायन्स) भौतिकशास्त्र हा अभ्यासक्रम करून विद्यार्थी, वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामान शास्त्रज्ञ, फॉरेन्सिक लॅबमध्ये विश्लेषक, आयएएस, वायरलेस स्ट्रीममध्ये पोलिस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक, दूरसंचार अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत. एकूणच पदव्युत्तर शैक्षणिक भौतिकशास्त्र विभागामध्ये शैक्षणिक मूल्यांची जोपासना, शिस्त राखणे, संशोधनाची प्रेरणा, विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक वृत्तीचा प्रभावी प्रसार करणे यासाठी प्रयत्न केले जात आहे.

# पुण्य नगरी

# महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात

पुण्य नगरी / प्रतिनिधी

### कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन

### विद्यापीठात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची सभा

अमरावती : सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी हितार्थ असलेल्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी प्राचार्य, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या शुक्रवारी झालेल्या संयुक्त सभेत केले. विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विद्यापीठ परिसरातील दृकश्राव्य सभागृहात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांची संयुक्त सभा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते.



व्यासपीठावर विद्यार्थी विकास मंडळाचे अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. साजन देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निखिल नळोडे, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. नेत्रा मानकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत, शुद्ध पेयजल, शिक्षण संरक्षण, विद्याधन, विद्यार्थी विकास निधी, शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, सायकल, विद्यार्थी सुरक्षा, स्व. रामकला रामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती, विद्यापीठ संचित निधी, महाविद्यालय संचित निधी आणि विविध पुरस्कार योजनेमध्ये असलेले आदर्श विद्यार्थी पुरस्कार, बेस्ट एन. सी. सी. कॅडेट, उत्कृष्ट कलावंत उत्कृष्ट विद्यार्थी, विद्यार्थीनी पुरस्कार अशा विविध योजनांची माहिती दिली. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने सभेची सुरवात करण्यात आली. सभेच्या आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी स्पष्ट केली. सूत्रसंचालन व आभार डॉ. अभिजित इंगळे यांनी मानले.

नवभारत

# विवि की योजनाएं विद्यार्थियों तक पहुंचाएं

## उपकुलपति डॉ.बाराहाते ने दिए निर्देश

अमरावती, ब्यूरो. विश्वविद्यालय की लाभकारी योजनाओं को सभी कॉलेज विद्यार्थियों तक पहुंचाने का आह्वान उपकुलपति डॉ. मिलिंद बाहाराहते ने किया. प्राचार्य, विद्यार्थी विकास अधिकारी की संयुक्त बैठक में वह बोल रहे थे. संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के छात्र विकास विभाग की ओर से विश्वविद्यालय परिसर के ऑडियो-विजुअल हॉल में बैठक आयोजित की गई थी. बैठक में विद्यार्थी विकास परिषद के अमरावती जिला समन्वयक डा. सावन



देशमुख, यवतमाल जिला समन्वयक डॉ. निखिल नालोदे, अकोला जिला समन्वयक. डॉ. नेत्रा मानकर, छात्र विकास संचालक डा. राजीव बोरकर उपस्थित थे. उन्होंने कहा कि संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के छात्रों के लिए 12 योजनाएं हैं. योजना का लाभ विद्यार्थियों को मिले, इसकी प्रक्रिया विश्वविद्यालय द्वारा महाविद्यालयों को ऑनलाइन पोर्टल के माध्यम से उपलब्ध करायी गयी है तथा महाविद्यालयों को अपने महाविद्यालय में विद्यार्थियों के योजना आवेदन पत्र पोर्टल के माध्यम से विश्वविद्यालय में जमा करने होंगे. ग्रामीण क्षेत्र के गरीब एवं जरूरतमंद विद्यार्थियों को योजनाओं के प्रति जागरूक कर उनका लाभ दिलाया जाए, जिससे न केवल ऐसे विद्यार्थी विकास की धारा में आएंगे, बल्कि योजनाओं के उद्देश्य भी सफल होंगे. बैठक की शुरुआत संत गाडगे बाबा की छवि का पूजन, दीप प्रज्वलन एवं विश्वविद्यालय गीत से हुई. बैठक के आयोजन के पीछे भूमिका डा. राजीव बोरकर ने समझाई. समन्वय एवं आभार डा. अभिजीत इंगले ने माना. बैठक में विश्वविद्यालय के विभिन्न प्राधिकरणों के सदस्य, विश्वविद्यालय के अंतर्गत आने वाले सभी पांच जिलों के कॉलेजों के प्राचार्य, कॉलेजों के छात्र विकास अधिकारी और बड़ी संख्या में शिक्षक उपस्थित थे.

अमरावती इव्हिनिंग

# मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर करण्याच्या सुवर्णसंधी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदव्युत्तर पदविका समुपदेशन व मनसोपचार क्लिनिकल सायकॉलॉजी आणि पदविका समुपदेशन व मनसोपचार अभ्यासक्रमाच्या सत्र २०२४ – २०२५ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

आपले मानसिक आरोग्य हे आपल्या आरोग्याचा एक महत्त्वाचा भाग आहे तसेच तो आपल्या विकासाचा पैलूसुद्धा ठरतो. अशा या अत्यंत महत्त्वाचे मानसिक आरोग्य प्रदान करणारा व विविध प्रकारच्या मानसिक त्रास व आजाराने ग्रस्त रुग्णांना त्यातून बाहेर काढण्याचे कार्य करणारा कौशल्ययुक्त व समुपदेशक निर्माण करणारा एकमेव रोजगाराभिमुख अभ्यासक्रम म्हणजे पदव्युत्तर पदविका समुपदेशन व मनसोपचार (½.G$ EX ŠÑÜXÚ–ÌEX‹T> Ç>XÉ> ¿ÜYŒ‹S>ÊÑÜÉ–ÕÇ>ÐZ") आणि पदविका समुपदेशन व मनसोपचार (¿. H«$ µŠÉÐÌÑÌŒÇ> EX ŠÑÜXÚ–ÌEX‹T> Ç>XÉ> ¿ÜYŒ‹S> ÊÑÜÉ–ÕÇ>ÐZ")

या अभ्यासक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे समुपदेशनात वापरली जाणारी विविध तंत्र, पद्धती व समुपदेशनाच्या वरच्या स्तरावर वापरल्या जाणाऱ्या आर.टी.बी.टी., सी.बी.टी. लोगो थेरपी अशा विविध मनसोपचार पद्धतींचे तसेच विविध मानसशास्त्रीय चाचण्यांचा प्रात्यक्षिकेद्वारे अभ्यास करून घेणे. ज्यामुळे समुपदेशन व मनसोपचार पद्धतींचे सिद्धांतिक व्यावसायिक व व्यवहारिक प्रशिक्षण घेऊन समुपदेशन शास्त्राचे सखोल ज्ञान विद्यार्थी प्राप्त करू शकतात. सोबतच विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शासकीय निमशासकीय व खाजगी शाळा, महाविद्यालय व रुग्णालयात समुपदेशक म्हणून सेवा देऊ शकतात तसेच व्यसनमुक्ती केंद्र व पुनर्वसन केंद्र, वृद्धाश्रम, कुटुंब न्यायालय विविध प्रकारच्या कंपनी व सेवाभावी संस्था व भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी काढलेल्या प्रोजेक्टमध्ये समुपदेशक पदावर नियुक्ती तसेच समुपदेशक म्हणून विद्यार्थी आपल्या घरी समुपदेशन केंद्र सुरु करून दिवसें-दिवस वाढत जाणाऱ्या समाजातील कौटुंबिक समस्या उदा. कुटुंबात होणारे वाद, वाढत चाललेले घटस्फोटाचे प्रमाण व कुटुंबातील मुलांच्या समस्या सोडवून रोजगार स्वतःच्या घरीच प्राप्त करू शकतो.

या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सामाजिक तसेच शासकीय क्षेत्रामध्ये विद्यार्थी रोजगार प्राप्त करू शकतो या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांकरिता वेळोवेळी तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शन प्रेरणादायी व्याख्यान कार्यशाळा परिसंवाद शैक्षणिक सहल संस्था भेटी वेगवेगळ्या शहरातील नामांकित समुपदेशन केंद्र व तेथील कार्यप्रणालीचे प्रत्यक्ष निरीक्षण अशा प्रकार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्जनशील उपक्रम राबविण्यात येतात. अशा या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाला कुठल्याही शाखेचा पदवीधर युवक व युवती प्रौढ व्यक्ती गृहिणी महिला तसेच शिक्षक, डॉक्टर, पोलीस, बँकेतील कर्मचारी, समाजसेवक, नर्स व विविध क्षेत्रातील व्यावसायिक व्यक्ती प्रवेश घेऊ शकते. याकरिता वयाची अट नाही.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रा.जुबेर खान (९६७३२१५२८५), प्रा. मंजुषा वानखडे (८८०५०९०५९९), प्रा. शिवानी अग्रवाल (९४२३३३८७८९), प्रा. भावना नव्हाळे (९९६०२२५७५५), प्रा. अर्चना ढोरे (९३७३७१२८८१) यांच्याशी संपर्क करून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन डॉ. श्रीकांत पाटील संचालक विभागप्रमुख आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांनी केले आहेत.

-डॉ. श्रीकांत पाटील
संचालक
आजीवन अध्ययन व विस्तार विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## तरुण भारत

# कथांमधून लेखकांची जीवनदृष्टी प्रकटते

### डॉ. माधव पुटवाड यांचे प्रतिपादन

### विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञानकथा दिन



डॉ. माधव पुटवाड मार्गदर्शन करताना

◆ अमरावती, २२ जुलै -

अवतीभोवती असलेली सर्वसामान्य माणसे, त्यांचा सभोवताल, दैनंदिन जीवनानुभव कथांच्या माध्यमातून मांडण्याची दीर्घ परंपरा आहे. अनुभवांची कौशल्यपूर्ण गुंफण करण्यातून जसा कथार्थ सूचित होतो, तशी लेखकांची जीवनदृष्टीही त्यातून प्रकटते, असे प्रतिपादन समीक्षक प्रा. डॉ. माधव पुटवाड यांनी केले.

अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञानकथा दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान कथांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर प्रा. डॉ. प्रणव कोलते उपस्थित होते.

नामवंत खगोल शास्त्रज्ञ, साहित्यिक डॉ.जयंत नारळीकर यांचे मराठी विज्ञान कथाक्षेत्रातील योगदान लक्षात घेता, त्यांचा जन्मदिवस १९ जुलै हा राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जागतिक ख्यातीचे शास्त्रज्ञ आणि मराठी विज्ञानकथेला आधुनिक चेहरा देणारे साक्षेपी लेखक म्हणून डॉ. नारळीकरांचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील साहित्य व विज्ञान संस्थांनी या दिवशी विज्ञानकथा स्पर्धा, विज्ञानकथा वाचन, विज्ञानकथा कथन, चर्चा, परिसंवाद, भाषणे असे कार्यक्रम ठेवावेत, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेने केले होते. त्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सन २०२२ पासून १९ जुलै हा दिवस राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा केला जात असून महाराष्ट्रात यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याउपक्रमाचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. प्रणव कोलते यांनी आपल्या मनोगतातून देशातील सर्वसामान्य माणसात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञान प्रसाराची आवश्यकता असून त्यासाठी साहित्य हे सशक्त माध्यम आहे, विज्ञान साहित्याची निर्मिती जेवढी विपुल होईल, तेवढे मराठी साहित्य अधिक समृद्ध होईल, असे प्रतिपादन केले.

यावेळी जयंत नारळीकर व जयंत देशपांडे यांच्या विज्ञान कथांचे अभिवाचन करण्यात आले. अभिवाचक म्हणून सारिका वनवे, अमृता राऊत यांनी सहभाग नोंदविला. यावेळी विभागातील अंशदायी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. संचालन अभिजित इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन वैष्णवी मुळे यांनी केले. ◄(तभा वृत्तसेवा)

## पुण्य नगरी

# 'इतरांचा आदर-महिलांचा सन्मान' विषयावर सहविचार सभा

### विद्यापीठातील वूमेन्स स्टडिज सेंटर व मास्वे संस्थेचा संयुक्त उपक्रम



पुण्य नगरी / प्रतिनिधी

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वूमेन्स स्टडिज सेंटर आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) यांच्या संयुक्त विद्यमाने 'इतरांचा आदर-महिलांचा सन्मान' या विषयावर सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी वूमेन्स स्टडिज सेंटरच्या संचालक डॉ. वैशाली गुडधे, मार्गदर्शक म्हणून मास्वेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य डॉ. अंबादास मोहिते उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि पुढाकारातून शिव्यामुक्त अभियान सुरू करण्यासाठी ही सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती.

सहविचार सभेला डॉ. प्रशांत विघे, प्राचार्य डॉ. अनुराधा वैद्य, डॉ. मोना चिमोटे, रजिया सुलताना, डॉ. दया पांडे, डॉ. अलका गायकवाड, पंडित पंडागळे, डॉ. श्यामसुंदर निकम, डॉ. प्रणव कोलते, डॉ. अंजली वाठ, रवींद्र लाखोडे, ॲड. शीतल मेटकर, डॉ. शिवाजी तुपेकर, डॉ. संजय खडसे, डॉ. महेंद्र मेटे, डॉ. किशोर राऊत, डॉ. जाकीर खान सलाम खान, आशिष भाकरे, राजलक्ष्मी केशरवाणी, रुची कक्कड़णीया, जिजाऊ ब्रिगेडच्या डॉ. मनाली तायडे, छाया देशमुख, ॲड. संध्या वानखडे आदींची उपस्थिती होती. या सभेत स्त्रियांविरुद्ध वापरल्या जाणाऱ्या शिव्यांबाबत प्रतिबंधात्मक दृष्टीकोनातून विविध पातळ्यांवर चर्चा झाली. उपस्थित सर्वांनी शिव्यामुक्त समाज तयार करण्याबाबत आपापली मते व्यक्त केली. सभेत 'शिव्यामुक्त समाज अभियान समिती' गठित करण्यात आली.

# तरुण भारत

# विद्यापीठाचा प्रत्येक कर्मचारी 'डायमंड'

## कुलगुरू डॉ. बारहाते यांचे गौरवोद्गार

♦ अमरावती, ३० जून

विद्यापीठाचे कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत आहेत. आपल्या कुटुंबाप्रमाणे त्यांनी विद्यापीठाला प्रामाणिक सेवा दिली आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचारी हा विद्यापीठाचा एक डायमंड आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. त्यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, नियंत्रण अधिकारी सहायक कुलसचिव रवींद्र सयाम, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. गजानन मुळे, सहायक ग्रंथपाल व्ही.डी. बायते, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांची उपस्थिती होती.



सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना कुलगुरू

कुलगुरू पुढे म्हणाले, मनुष्यबळाचा प्रश्न सोडविण्याचे विद्यापीठाचे सतत प्रयत्न सुरू आहेत. हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. एक टिम म्हणून आपले काम असेच पुढे नेऊ असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी गिरीश पहूरकर, राजेंद्र पायकढंडे, एच.एस. खिरडकर, बाबाराव चौधरी, सुधाकर पांडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

याप्रसंगी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे व कोषाध्यक्ष राजेश एडले तसेच पदाधिकाऱ्यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. आभार कुलगुरूंचे स्वीय सहायक रमेश जाधव यांनी मानले. (तभा वृत्तसेवा)

# लोकमत

मिलिंद बारहाते यांनी केली प्रस्तावित बांधकाम परिसराचा पाहणी : साडेसतरा कोटींतून साकारणार

# अमरावती विद्यापीठाचे बुलढाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेज



लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यापीठांतर्गत बुलढाणा येथे असलेल्या मॉडेल डिग्री कॉलेजला नुकतीच भेट देऊन महाविद्यालयाच्या प्रस्तावित बांधकामाच्या जागेची पाहणी केली. हे कॉलेज येत्या काळात पश्चिम विदर्भासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास कुलगुरूंनी व्यक्त केला.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. विजय नागरे, अधिसभा सदस्य डॉ. नीलेश गावंडे, आशिष सावजी, बीरसिंगपूर येथील सरपंचाचे यजमान संजय शिंदे, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, विजय चवरे, रमेश जाधव आदी उपस्थित होते.

बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजला चांगला प्रतिसाद मिळत असून त्याकरिता शासनाने बीरसिंगपूर शिवारात, अजिंठा रोडलगत, सैनिक शाळेच्या शेजारी १५ एकर जमीन मंजूर केली आहे. महाविद्यालयाच्या साडेसतरा कोटी रुपयांच्या प्रस्तावित बांधकामास लवकरच \सुरुवात करण्याचा विद्यापीठाचा मानस असून, सदर महाविद्यालय उत्कृष्ट दर्जाचे तयार होणार असल्याची माहिती कुलगुरूंनी याप्रसंगी दिली. लवकरात लवकर महाविद्यालयाच्या प्रस्तावित बांधकामाच्या साडेसतरा कोटी रुपयांच्या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरात मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आमदार संजय गायकवाड यांची उपस्थिती याप्रसंगी होती. त्यांनी मॉडेल डिग्री कॉलेजसंदर्भात शासनाकडून सर्व प्रकारची मदत मिळण्याकरिता सर्व प्रयत्न केल्या जातील. तसेच या महाविद्यालयाला मुख्य रस्त्यांपासून असलेला रस्ता आमदार निधीतून बांधून देणार असल्याचे संजय गायकवाड यांनी सांगितले. या विभागाच्या विकासाकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंकडून होत असलेल्या प्रयत्नांचे त्यांनी याप्रसंगी कौतुक केले.

दैनिक दिव्य मराठी

**अपेक्षा** • खेळाडूंचा सत्कारआणि क्रीडा संचालकांच्या कार्यशाळेचा समारोप

# सुदृढ पिढी घडवण्यासाठी क्रीडा शिक्षकांनी परिश्रम घ्यावे : डॉ. ढोरे

प्रतिनिधी | अमरावती

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकांना मानाचे स्थान मिळाले आहे. मात्र, आता जबाबदारी वाढली असून, क्रीडा शिक्षकांनी सुदृढ पिढी तयार करण्यासाठी परिश्रम घ्यावेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा खेळाडूंनी नावलौकिक केला आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालकांच्या कार्यशाळेचा समारोप आणि उत्कृष्ट खेळाडूंच्या सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. तनुजा राऊत, प्रमुख पाहुणे म्हणून अधिसभा सदस्य तथा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. सुभाष गावंडे, सदस्य डॉ. विकास टोणे उपस्थित होते.

पुढे बोलताना प्र-कुलगुरू म्हणाले, कार्यशाळेचा क्रीडा संचालकांना त्याचा मोठा लाभ होईल, असे सांगून पुरस्कारप्राप्त सर्व खेळाडूंचे त्यांनी अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात. डॉ. विकास टोणे म्हणाले, कार्यशाळेत मिळालेल्या मार्गदर्शनामुळे मरगळ दूर झाली आहे. एवढेच नाही, तर शारीरिक आणि मानसिक विकासासाठी कार्यशाळा महत्त्वाची ठरली असून त्याचा विद्यार्थ्यांनाही लाभ होईल. डॉ. सुभाष गावंडे म्हणाले, विद्यापीठाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयच नाही, तर ऑलिम्पिक, आशियाई स्पर्धेतही मोलाची कामगिरी केली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने विद्यापीठ खेळाडू घडवण्याचे मोठे कार्य करत असल्याचेही ते म्हणाले. या प्रसंगी डॉ. मनोज व्यवहारे, डॉ. रुपाली टोणे यांनी मनोगतातून कार्यशाळेतून खूप काही मिळाले असून त्याचा मोठा लाभ होणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी विद्यापीठाचे सेवानिवृत्त कर्मचारी सुधाकर पांडे यांचा प्र-कुलगुरूंच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभांगी दामले यांनी केले, तर आभार डॉ. कविता वाटाणे यांनी मानले. कार्यक्रमाला नरेश देशमुख, अरुण लोहे, संतोष वानखडे, अब्दुल तौसिफ, सुधाकर पांडे, स्वप्निल बनसोड, धनराज भालेराव, कार्यशाळेकरिता उपस्थित असलेले संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण, उत्कृष्ट खेळाडू, नैपुण्य प्राप्त चमूतील खेळाडू, चमू व्यवस्थापक, चमू प्रशिक्षक तसेच खेळाडूंचे पालक उपस्थित होते.



मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना खेळाडू.

## खेळाडूंसह चमू व्यवस्थापकांचा सत्कार

याप्रसंगी शिवाजी गेडाम, पूनम कैथवास, वासित पारे, अनामिका डेका, सानिका चांदुरकर, यश भुसे, साक्षी ढोकणे, सुमित गुरमुले, गणेश नागे, सागर जाधव या खेळाडूंचा रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तर चमू व्यवस्थापक डॉ. पी. व्ही. पिंगळे, पूजा रहाटे, डॉ. गजानन बढे, प्रा. संजय काळे, अनुप मिश्रा, डॉ. प्रमोद हुबाड, बळवंत बोबडे, डॉ. नंदू चव्हाण, विशाल वाघमारे, डॉ. बी. सी. डाबरे, नितेश मंगुळकर, डॉ. राजेश चंद्रवंशी, अतुल तायडे, जितेंद्र ढिके, डॉ. दिलीप शहाडे यांचा ट्रॅक सूट देऊन प्र-कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## नवभारत

**समारोह** कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते का प्रतिपादन, तपोवन को भेंट

# दाजीसाहेब का कार्य समाज विकास का दीपस्तंभ

■ अमरावती, ब्यूरो. पद्मश्री डॉ. शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धन का कार्य समाज विकास का दीपस्तंभ है. कुष्ठ मरीजों की सेवा के लिए उन्होंने अपना संपूर्ण जीवन अर्पण किया. 1950 में कुष्ठ रोगियों के लिए विदर्भ महारोगी सेवा मंडल की तपोवन में स्थापना की. उनके कार्यों से सभी ने प्रेरणा लेनी चाहिए. उक्त प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ के कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने किया. विद्यापीठ से सटकर स्थित तपोवन संस्था को कुलगुरु ने खुद भेंट दी. इस अवसर पर संस्था के अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई, सचिव सहदेव गोडे, सहसचिव ऋषिकेश देशपांडे, विश्वस्त जुबीन धोतीवाला, विलास मराठे, आश्विन आलशी, विद्याताई देसाई, भीमराव ठाकरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित थे. उन्होंने केंद्र सरकार द्वारा पद्मश्री दाजीसाहेब को 1955 में कुष्ठ निर्मूलन कार्यों के लिए दी गई गाड़ी, दाजीसाहेब द्वारा इस्तेमाल की जानेवाली टांगा गाड़ी, परिसर के हाथकरघा से तैयार होने वाले वस्त्र, कपड़ा, सतरंजी के अलावा लोहे की अलमारी और लकड़ी का फर्नीचर बनाने का कारखाना, रसोई घर, गौशाला, साहित्य बिक्री भंडार का जायजा कर सभी कामों की कुलगुरु ने प्रशंसा की. तपोवन संस्था 388 एकड़ परिसर में रहने की जानकारी दी. कुलगुरु ने निसर्गरम्य गार्डन का भी जायजा किया. साथ ही दाजीसाहेब द्वारा उस समय निर्मित शिवालय, श्रीराम मूर्ति तथा स्वतंत्रता संग्राम के शहीद योद्धाओं के स्मृति प्रित्यर्थ निर्मित स्मारक का भी कुलगुरु ने जायजा किया. इस अवसर पर कुलगुरु का संस्था के अध्यक्ष ने शाल, श्रीफल, स्मृति चिन्ह व पुस्तक देकर सत्कार किया. साथ ही जनसंपर्क अधिकारी का भी उन्होंने स्वागत किया.



### स्वाधीनता लड़ाई में दिए योगदान की दी जानकारी

दाजीसाहेब पटवर्धन द्वारा स्थापित इस संस्था को 75 साल पूर्ण हो गए हैं. आज भी इस संस्था का कार्य निरंतर जारी है. इस अवसर पर प्राचार्य डॉ. सुभाष गवई ने दाजीसाहेब और माईसाहेब पटवर्धन के रहने का कमरा और भारतीय स्वाधीनता लड़ाई में दिए योगदान की जानकारी दी. इस मौके पर कुलगुरु ने दाजीसाहेब के दुर्लभ गैलरी का जायजा कर उनके कार्यों की पूर्ण जानकारी ली.

## पुण्यनगरी

# नवीन अभ्यासक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

**प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे आवाहन**

**विद्यापीठात प्रशिक्षण कार्यशाळा**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

अमरावती : नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी स्तरावर नवीन अभ्यासक्रम २०२४-२५ पासून लागू करावयाचे असून त्याकरिता शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे. शिक्षकांनी नवीन अभ्यासक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. या धोरणाची माहिती विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमाकरिता २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाद्वारे नवीन अभ्यासक्रम लागू केल्या जाणार आहे. हा अभ्यासक्रम लागू करण्याकरिता त्याची संपूर्ण माहिती शिक्षकांना मिळावी, यासाठी प्रशिक्षण देण्याकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासह पाचही जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमध्ये एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



त्यानुसार विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहामध्ये अमरावती जिल्ह्याकरिता १६ जुलै रोजी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मानवविद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे, मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मो. अतिक यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेत विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल व ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या रेडिनेस फॉर इम्प्लिमेंटेशन यावर सखोल मार्गदर्शन केले. तर विद्यापीठातील मानवविद्या शाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे व डॉ. अण्णा वैद्य यांनी मार्गदर्शन करताना पदवी पातळीवर नवीन शैक्षणिक धोरण राबविणे बंधनकारक असल्याचे सांगून नवीन शैक्षणिक धोरण शिक्षक, विद्यार्थी, पालकांपर्यंत पोहचविण्यास या कार्यशाळेचा उपयोग होणार असल्याचे सांगितले. वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. डी.डब्ल्यू. निचित, डॉ. अरुणा वाडेकर, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, डॉ. तनुजा राऊत व डॉ. वैशाली धनविजय यांनीही कार्यशाळेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल तर आभार प्रदर्शन मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मो. अतिक यांनी केले.

The Hitavada

# Strictly implement NEP: Dr Dhore

## SGBAU holds workshop for teachers of affiliated colleges



Dr Mahendra Dhore, Dr Avinash Asnare, Dr Mona Chimote, Dr Sanjay Dudul and others present during the workshop of teachers organised by the Sant Gadgebaba Amravati University.

■ **Amravati Bureau**

AMRAVATI, July 17

"TEACHERS should strictly implement new syllabus at the degree level from 2024-25 according to the New Education Policy. This workshop will be important for training the teachers. They should conveyed information about the policy to students and parents," appealed Dr Mahendra Dhore, Pro-Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University.

Dr Dhore was addressing daylong training programme organised at the audio-visual auditorium of Sant Gadgebaba Amravati University as part of training programme being organising in all affilitated colleges to Sant Gadgebaba Amravati University from all the five districts so that all teachers should have information for implementing new syllabus which will be implemented from the University from the educational session 2024-25 as per New Educational Policy.

Dr Avinash Asnare, Registrar, Dr Mona Chimote, Dean of the Faculty of Humanities and Head of the Department of Marathi, Dr Sanjay Dudul, Department of Science and Technology, Dr Vaishali Gudadhe, Dean, Faculty of Interdisciplinary Studies, Dr Deepak Dhote, Principal of Brajlal Biyani Science College, Amravati and Dr Md. Atique, Director of Malviya Mission Teacher Training Centre were present on the dais.

> "Boards of Studies have put a lot of effort into preparing the new syllabus according to the NEP"

Further in his presidential speech, Dr Dhore further said that it was after a gap of 34 years after 1986 that we have got a new education policy. From 2023-24, the Education Policy was implemented in Post Graduate and Autonomous Colleges. New educational policy is being implemented at the graduate level from this year. Boards of Studies have put a lot of effort into preparing the new syllabus. The workshop are being conducted under the leadership and guidance of Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University. As the training workshop is being held for teachers of all the five districts under all four faculties, it will be easier to implement the new curriculum, said Dr Dhore. He appealed to all to take benefit of this training workshop and strive to implement curriculum as per the New Educational Policy at the graduate level.

Dr Sanjay Dudul and Dr Deepak Dhote gave in-depth guidance on the readiness for implementation of the new education policy. Guiding the teachers, Dr Mona Chimote and Dr Anna Vaidya stressed that it was mandatory to implement New Educational Policy at the degree level and said the workshop will be used to convey New Educational Policy to teachers, students and parents. They both also stressed on importance of teachers in nation building.

Dr D W Nichit, Dean of Department of Commerce and Management and Dr Aruna Wadekar and in the later session, Dr Tanuja Raut, Dean of the Faculty of Interdisciplinary Studies, Dr Vaishali Gudhe, Dr Tanuja Raut and Dr Vaishali Dhanvijay guided the programme. The inaugural session began with the University Anthem.

Dr Sanjay Dudul delivered the introductory remarks as well as conducted the proceedings of the programme while Dr Md. Atiq proposed a vote of thanks. Dr Ajay Lad as well as principals, professors and teachers of colleges in Amravati city and district were present in large numbers.

प्रतिदिन अखबार

# नई शिक्षा : नया पाठ्यक्रम लागू करने कड़ाई से करें अमल

## प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे ने कहा, विद्यापीठ में प्रशिक्षण कार्यशाला





प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 17 जुलाई - नई शैक्षणिक नीति के अनुसार पदवी स्तर पर नया पाठ्यक्रम 2024-25 से लागू करना है. इसके लिए शिक्षकों को प्रशिक्षण देने हेतु कार्यशाला महत्वपूर्ण साबित होगी. शिक्षकों से नए पाठ्यक्रम पर कड़ाई से अमल कर इसकी जानकारी विद्यार्थी व पालकों तक पहुंचाने का आवाहन प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे ने किया. नया पाठ्यक्रम लागू करने के लिए उसकी संपूर्ण जानकारी शिक्षकों को मिले, इसलिए प्रशिक्षण देने हेतु अमरावती विद्यापीठ सहित पांचों जिलों के संलग्नित महाविद्यालयों में एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाला का आयोजन किया गया है. मंगलवार 16 जुलाई को यह कार्यशाला संपन्न हुई. इस प्रसंग पर अपने अध्यक्षीय संबोधन में मार्गदर्शन देते हुए वे बोल रहे थे. कार्यक्रम में कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभाग प्रमुख मोना चिमोटे, अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, वैशाली गुडधे, शिवाजी महाविद्यालय के प्राचार्य डॉ. दीपक धोटे, डॉ. मो. अतीक आदि मान्यवर उपस्थित थे.

डॉ. ढोरे ने आगे कहा कि, 34 वर्षों के बाद नई शैक्षणिक नीति हमें मिली है. इस वर्ष से पदवी स्तर पर शैक्षणिक नीति लागू हो रही है. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते के नेतृत्व व मार्गदर्शन में यह प्रशिक्षण कार्यशाला आयोजित की गई है. इस कार्यशाला में शिक्षकों की सभी शंकाओं का निराकरण होगा. ये प्रशिक्षण कार्यशाला पांचों जिलों के शिक्षकों के लिए होने के कारण नए पाठ्यक्रम पर अमल करने हेतु सुलभ होगी. इस प्रशिक्षण कार्यशाला का सभी ने लाभ उठाकर पदवी स्तर पर नई शैक्षणिक नीति के अनुसार अभ्यासक्रम लागू करने हेतु परिश्रम करें. इस माध्यम से विद्यार्थी, पालकों तक इसकी जानकारी सभी शिक्षकों ने पहुंचाना चाहिए, ऐसा आवाहन भी उन्होंने किया. कार्यक्रम में उपस्थित अन्य अतिथियों ने भी नई शैक्षणिक नीति के संबंध में विस्तृत मार्गदर्शन किया. राष्ट्र विकास में शिक्षकों की महत्वपूर्ण भूमिका होने की बात भी उन्होंने कही. वाणिज्य व व्यवस्थापन विभाग के अधिष्ठाता डॉ. [illegible] व डॉ. [illegible] ने दूसरे सत्र में अंतर विद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, डॉ. वैशाली धनविजय ने मार्गदर्शन किया. संचालन व प्रस्तावना विज्ञान व तकनीकी ज्ञान के अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल ने रखी. आभार प्रदर्शन विद्यापीठ के मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र के संचालक डॉ. मो. अतीक ने किया. कार्यशाला में समन्वय के संचालक डॉ. अजय खान, अमरावती शहर सहित जिले के महाविद्यालयों के प्राचार्य व प्राध्यापक व शिक्षक बड़ी संख्या में उपस्थित थे.

दिव्य मराठी

**सत्कार सोहळा** • विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप

# विद्यापीठाचा प्रत्येक कर्मचारी हिरा आहे : कुलगुरू डॉ. बारहाते





निरोप समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू तर दुसऱ्या छायाचित्रात सत्कारमूर्तीचा सत्कार करताना कुलगुरूंसह विद्यापीठाचे पदाधिकारी व कर्मचारी.

प्रतिनिधी | अमरावती

विद्यापीठाचे कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत आहेत. आपल्या कुटुंबाप्रमाणे त्यांनी विद्यापीठाला प्रामाणिक सेवा दिली आहे, त्यामुळे प्रत्येक कर्मचारी हा विद्यापीठाचा एक हिराच आहे, असे भावोद्गार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी नुकतेच कर्तव्यपूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या प्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी मंगेश वरखेडे, नियंत्रण अधिकारी सहायक कुलसचिव रवींद्र सयाम, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गजानन मुळे, सहायक ग्रंथपाल व्ही. डी. बापते, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती गिरीश पहूरकर, राजेंद्र पाचकवडे, एच. एस. शिरखरे, बाबाराव चौधरी, सुधाकर पांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांची उपस्थिती होती.

### सत्कारमूर्तींचा पत्नीसह सत्कार

या वेळी गिरीश पहूरकर, राजेंद्र पाचकवडे, एच. एस. शिरखरे, बाबाराव चौधरी व सुधाकर पांडे यांचा कुलगुरूंनी शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. तर सत्कारमूर्तींच्या अर्धांगिनींचा मनीषा थोंडे यांनी साडीचोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. या प्रसंगी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने अध्यक्ष मंगेश वरखेडे व कोषाध्यक्ष राजेश एडले तसेच पदाधिकाऱ्यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला.

कुलगुरू म्हणाले, मनुष्यबळाचा प्रश्न सोडवण्याचे विद्यापीठाचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठीय मनुष्यबळाचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. एक टीम म्हणून आपले काम असेच पुढे नेऊ असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सत्कारमूर्तींनी आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगताना सहकारी कर्मचाऱ्यांच्या मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. नियंत्रण अधिकारी रवींद्र सयाम, डॉ. गजानन मुळे, व्ही. डी. बापते, अजय देशमुख यांनीही मनोगतातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले, तर आभार रमेश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# देशोन्नती

## राष्ट्रीय विज्ञानकथा दिनानिमित्ताने विविध विज्ञानकथांचे अभिवाचन

### विज्ञान प्रसारासाठी साहित्याचे योगदान महत्त्वाचे - डॉ. माधव पुटवाड



देशोन्नती वृत्तसंकलन

**अमरावती :** अवतीभोवती असलेली सर्वसामान्य माणसे, त्यांचा सभोवताल, दैनंदिन जीवनानुभव कथांच्या माध्यमातून मांडण्याची दीर्घ परंपरा आहे. अनुभवांची कौशल्यपूर्ण गुंफण करण्यातून जसा कथार्थ सूचित होतो, तशी लेखकांची जीवनदृष्टीही त्यातून प्रकटते, असे प्रतिपादन समीक्षक प्रा.डॉ. माधव पुटवाड यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने राष्ट्रीय विज्ञानकथा दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान कथांच्या अभिवाचन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. प्रणव कोलते उपस्थित होते.

नामवंत खगोलशास्त्रज्ञ, साहित्यिक डॉ.जयंत नारळीकर यांचे मराठी विज्ञान कथाक्षेत्रातील योगदान लक्षात घेता, त्यांचा जन्मदिवस १९ जुलै हा राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. प्रणव कोलते यांनी आपल्या मनोगतातून देशातील सर्वसामान्य माणसात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञान प्रसाराची आवश्यकता असून त्यासाठी साहित्य हे सशक्त माध्यम आहे. विज्ञान साहित्याची निर्मिती जेवढी विपुल होईल, तेवढे मराठी साहित्य अधिक समृद्ध होईल,असे प्रतिपादन केले.

यावेळी जयंत नारळीकर व जयंत देशपांडे यांच्या विज्ञान कथांचे अभिवाचन करण्यात आले. अभिवाचक म्हणून सारिका वनवे, अमृता राऊत यांनी सहभाग नोंदविला. यावेळी विभागातील अंशदायी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अभिजित इंगळे यांनी, तर आभारप्रदर्शन वैष्णवी मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनीष तायडे, राजकुमार चांदेकर, साधना पोकळे, प्राजक्ता गवई यांनी विशेष परिश्रम घेतले.

**The Hitavada**

# 'Need to improve attitude of students towards Guru'

■ Amravati Bureau
AMRAVATI, July 24



Guests and others present for the programme.

A SPECIAL programme to mark 'Guru Pournima' was organised by Department of Sociology from Sant Gadgebaba Amravati University recently. The programme was presided over by Dr K B Nayak, Head of Sociology Department while Dr K U Raut was present as the chief guest for the programme.

Dr K U Raut, in his guest speech said that in the present time the affection of the relationship between guru-disciples is decreasing due to many factors including social media. He said that efforts are needed to improve attitude of students towards teachers by keeping them away from social media.

Dr K B Nayak from the presidential speech said, 'Nature is our first teacher'. 'Gurubrhamha Guruvishnu Gurudevo Maheshwara, Guru Sakshat Parabramha Tasmai Sri Gurve Namah,' these lines tell us the exalted position of the 'Guru' in ancient India. He said that Buddha also stressed on importance of Guru through thoughts like 'Buddham Sharan Gachchami, Dhamma Sharan Gachchami, Sangam Sharan Gachchami'.

The importance of Guru is strongly emphasised in all religions.

After Nature, we are constantly learning something from parents, animals, objects. If one want to achieve a goal in life, there is no option without a guru, says Dr Nayak.

All students expressed their feelings towards their guru on the occasion. Dr K B Nayak and Dr K U Raut was welcomed with shawls, flowers and bouquets. The programme was co-ordinated by Dr Rohini Deshmukh while Sunita Ingle proposed a vote of thanks. All students of Sociology Department attended the programme. Dr Rohini Deshmukh, Dr Rohini Wavre, Sunita Ingle, Sadhana Ingole, research students Ramesh Pawar, Rajkumar Sarayam, staff Upendra Mishra worked hard for the success of the programme.

**पुण्य नगरी**

# विद्यापीठात समुपदेशन व मानसोपचार अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया



**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदव्युत्तर पदविका समुपदेशन व मानसोपचार कौन्सिलिंग सायकोथेरपी, पदविका समुपदेशन व मानसोपचार अभ्यासक्रमाच्या सत्र २०२४-२५ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. मानसिक आरोग्य प्रदान करणारा व विविध प्रकारच्या मानसिक त्रास व आजाराने ग्रस्त रुग्णांना त्यातून बाहेर काढण्याचे कार्य करणारा कौशल्ययुक्त व समुपदेशक निर्माण करणारा हा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाला कुठल्याही शाखेचा पदवीधर युवक व युवती, प्रौढ व्यक्ती, गृहिणी महिला तसेच इतर कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती प्रवेश घेऊ शकते. याकरिता वयाची अट नाही.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रा. जुबेर खान, प्रा. मंजुषा बारबुद्धे, प्रा. शिवानी अग्रवाल, प्रा. भावना गव्हाळे, प्रा. अर्चना ढोरे यांच्याशी संपर्क करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

# दैनिक भास्कर

## विद्यार्थियों को योजनाओं का लाभ दें : बारहाते



**कार्यालय प्रतिनिधि | अमरावती.** छात्रों की विभिन्न योजनाओं का लाभ महाविद्यालयों को देना चाहिए। इस आशय की सलाह संत गाड़गेबाबा अमरावती विद्यापीठ के कुलपति डॉ.मिलिंद बारहाते ने दी। वे शुक्रवार को प्राचार्य, विद्यार्थी विकास अधिकारियों की संयुक्त बैठक में मार्गदर्शन कर रहे थे। संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के छात्र विकास विभाग की ओर से विश्वविद्यालय परिसर के ऑडियो-विजुअल हॉल में प्राचार्य एवं छात्र विकास अधिकारियों की संयुक्त बैठक आयोजित की गयी थी। कुलपति ने कहा कि योजना का लाभ विद्यार्थियों को मिले, इसकी प्रक्रिया विश्वविद्यालय द्वारा महाविद्यालयों को ऑनलाइन पोर्टल के माध्यम से उपलब्ध करायी गयी है। महाविद्यालयों को अपने महाविद्यालय में विद्यार्थियों के योजना आवेदन पत्र पोर्टल के माध्यम से विश्वविद्यालय में जमा करने तथा लाभदें। ग्रामीण क्षेत्र के गरीब एवं जरूरतमंद विद्यार्थियों को योजनाओं के प्रति जागरूक कर उसका लाभ दें। छात्रों के लिए संत गाडगे बाबा कमाओ और सीखो योजना, छात्रों के लिए बस पास रियायत, स्वच्छ पेयजल, शिक्षा सुरक्षा, छात्रवृत्ति, छात्र विकास निधि, छात्रवृत्ति, कौशल विकास, साइकिल, छात्र सुरक्षा, स्वयं राम प्रकाश शामलाल राठी मेमोरियल छात्रवृत्ति, विश्वविद्यालय दायित्व निधि/कॉलेज दायित्व निधि और विभिन्न पुरस्कार योजना के तहत आदर्श छात्र पुरस्कार, सर्वश्रेष्ठ एन.सी.सी. कैडेट, उत्कृष्ट कलाकार, उत्कृष्ट छात्र, छात्रा पुरस्कार जैसी विभिन्न योजनाएं दी गई। बैठक के आयोजन की भूमिका संचालक डॉ. राजीव बोरकर ने प्रस्तुत की। आभार डॉ. अभिजीत इंगले ने माना। बैठक में विश्वविद्यालय के विभिन्न प्राधिकरणों के सदस्य, विश्वविद्यालय के अंतर्गत आने वाले सभी पांच जिलों के कॉलेजों के प्राचार्य, कॉलेजों के छात्र विकास अधिकारी और बड़ी संख्या में शिक्षक उपस्थित थे। इस अवसर पर विद्यार्थी विकास परिषद के अमरावती जिला समन्वयक डॉ. सावन देशमुख, यवतमाल जिला समन्वयक डॉ.निखिल नालोडे, अकोला जिला समन्वयक नेत्रा मानकर, छात्र विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित थे।

विदर्भ का प्रमुख हिंदी अखबार, दैनिक

# अमरावती मंडल

## विद्यापीठ में मनाई लोकमान्य तिलक की जयंती



अमरावती-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ में लोकमान्य बाल गंगाधर तिलक की जयंती मनाई गई. इस अवसर पर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे ने लोकमान्य तिलक की प्रतिमा का पूजन कर विद्यापीठ की ओर से अभिवादन किया. इस समय डॉ. नितिन कोली, डॉ. संजय डुडुल, डॉ. अजय लाड, डॉ. विलास नांदुरकर तथा शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, विद्यापीठ के अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित थे.

## विद्यापीठातील भौतिकशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन शैक्षणिक धोरणानुसार पुनर्रचना

[illegible]

● डॉ. संदीप वाघुळे

विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

दैनिक दिव्य मराठी

# विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी



लोकमान्य टिळकांना अभिवादन करताना विद्यापीठाचे पदाधिकारी व कर्मचारी.

अमरावती | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून विद्यापीठाच्या वतीने, अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, डॉ. अजय लाड, तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याबद्दल माहिती देत विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विदर्भ मतदार

# डॉ. अनंत मराठे विद्यापीठाचे शिक्षणतज्ज्ञ म्हणून नियुक्त

## राज्यपालांनी केली नियुक्ती

अमरावती (प्रतिनिधी) दि.१० : माजी



प्राचार्य डॉ. अनंत बाळकृष्ण मराठे यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेच्या सदस्यपदी शिक्षण तज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल कार्यालयाच्या वतीने प्रवीण दराडे यांनी यासंबंधीचे पत्र आज बुधवारी जारी केले आहे. डॉ. अनंत मराठे यांनी यापूर्वी विविध अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य पद यशस्वीरित्या भूषविले आहे. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य सुरुच आहे. आज महामहिम राज्यपालांनी डॉ. अनंत मराठे यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेच्या समिती सदस्य पदावर नियुक्ती केली आहे. शिक्षणतज्ञ म्हणून त्यांची ही नियुक्ती आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. डॉ. अनंत मराठे यांनी यापूर्वी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समित्यांवरदेखील कार्य केले आहे, हे विशेष.

# अमरावती विद्यापीठाचे संशोधन मंडळ गठीत

## आनंद दशपुते राज्यपाल नामनिर्देशित सदस्य



आनंद दशपुते

प्रतिनिधी / युवा केसरी

अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संशोधन कार्याला प्रोत्साहन व चालना देण्यासाठी विद्यापीठ कायद्यानुसार संशोधन मंडळ गठीत करण्यात आले आहे. त्यात राज्यपालांनी नामनिर्देशित केलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील आठ तज्ज्ञ सदस्यांमध्ये अमरावतीचे आनंद दशपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संशोधन मंडळाचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते राहणार असून एकूण 22 सदस्य राहणार आहे. त्यात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठातील चार अधिष्ठाता, कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेल्या चार संशोधकांमध्ये जळगावचे प्रो. प्रवीण पुराणिक, पुण्याचे प्रो. परीक्षित महाले, प्रो. अशोक घाटोळ, बुलडाण्याचे प्रो. डॉ. एस. बी. नागर, अमरावती विद्यापीठातील दोन शिक्षकांमध्ये डॉ. संदीप वाघुले, डॉ. डी. व्ही. चापरकर, मान्यताप्राप्त महाविद्यालयाच्या दोन शिक्षकांमध्ये यवतमाळचे डॉ. अजय लाड, अकोल्याच्या कौमुदी क्षीरसागर यांचा समावेश आहे. राज्यपालांनी नामनिर्देशित केलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील आठ तज्ज्ञ सदस्यांमध्ये अमरावतीचे प्रदीप काळेले, डॉ. स्वप्नील पोतदार, आनंद दशपुते, सीए दामोदर खंडेलवाल, डॉ. विक्रम वापट, अकोल्याचे डॉ. योगेश अग्रवाल, डॉ. शशांक भारद, यवतमाळच्या उमरखेडचे डॉ. सुहासकुमार पाटील यांचाही त्यात समावेश आहे. विद्यापीठाच्या इनोव्हेशन व इनक्युबेशनचे संचालक मंडळाचे सदस्य असतील असे 23 जणांचे हे मंडळ आहे. संशोधन मंडळाच्या वर्षातून तीन बैठका होतील. विद्यापीठ, महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्थांमध्ये संशोधन संवर्धनाची आणि दीर्घकालीन धोरण ठरविण्याची जबाबदारी या मंडळावर राहणार आहे.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यावार्ता

जुलै २०२४

ई - मासिक

**मार्गदर्शक**



**श्री सी. पी. राधाकृष्णन**
**मा. राज्यपाल तथा कुलपती**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**
**मा. कुलगुरू**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढारे**
**मा. प्र-कुलगुरू**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**



**डॉ. अविनाश असनारे**
**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

---

**संपादक**
**डॉ. विलास नांदुरकर**
जनसंपर्क अधिकारी

**सहसंपादक**
**श्री ओम जगताप**
जनसंपर्क विभाग